
॥ श्री गुरु :शरणम ॥

॥ ॐ श्रीमद् अमृतमूर्तये शिववामनाय नमः ॥

श्रीमन् महामाहेश्वराचार्यवर्य महासिद्धयोगी

श्री अभिनवगुप्तपादाचार्य विरचित

॥ तंत्रवटधानिका ॥



संकलक :- डॉ. केशव रामचंद्र जोशी एम. ए., पी. एच्. डी.

॥ योगीराज सद्‌गुरू श्रीसन्त वामनरावजी गुळवणीमहाराज ॥



शक्तिपाताचा महामेरू । बहुत जनासी आधारू ।
ब्रह्मस्थितीचा निर्धारू । शाम्भव योगी ॥

जन्म : शके १८०८, दि. २३/१२/१८८६, मार्गशीर्ष वद्य १३, श्रीक्षेत्र कुडुत्री,
समाधी : शके १८९६, दि. १५/१/१९७४, पौष वद्य ८, श्रीक्षेत्र पुणे.

।। श्रीगुरुःशरणम् ।।

।। ॐ श्रीमद् अमृतमूर्तये शिववामनाय नमः ।।

श्रीमन् महामाहेश्वराचार्यवर्य महासिद्धयोगी श्रीअभिनवगुप्तपादाचार्य विरचित

।। तंत्रवटधानिका ।।



-: अनुवादक :-

डॉ. केशव रामचंद्र जोशी

एम्.ए.,पीएच्.डी.

प्रकाशक ★
व्यवस्थापक,
सिद्धयोग प्रकाशन,
२६ / २०२ लक्ष्मीनगर,
पुणे ४११००९.

संगणकीय अक्षर जुळणी ★
"संजीवनी"
४, न्यू संजोग, राधा नगर,
तुळींज, नालासोपारा (पूर्व),
ता. वसई, जि.ठाणे.

मुद्रक ★
प्रसाद मुद्रणालय,
"मनःशांती"
५०४, शनिवार पेठ,
मेहुणपुरा, पुणे ४११०३०.

प्रकाशनकाल ★
प्रथमावृत्ती १९९७

मूल्य ५० रुपये ★

।।श्रीगुरुःशरणम्।।
।।ॐ श्रीमद् अमृतमूर्तये शिववामनाय नमः।।

प्रस्तावना :-

माझ्या हृदयसिंहासनावर अधिष्ठित झालेले अनुपायप्रक्रियासंपन्न अनुत्तर महासिद्धयोगी शक्तिपाताचार्यवर्य श्रीसंत गुळवणीमहाराज यांच्या अपार कृपाबलाने महामाहेश्वराचार्यवर्य महासिद्ध श्रीमद् अभिनवगुप्त विरचित "तंत्रवटधानिका" हा ग्रंथ मूळ संस्कृत श्लोक व त्याचे सुबोध मराठी भाषांतर यांसह साधक-वाचक-भक्तांना मराठी भाषेत प्रथमच उपलब्ध होत आहे, ही परमभाग्याची गोष्ट आहे. प्रातःस्मरणीय श्रीसद्गुरुनाथ-महाराजांनी आसेतुहिमाचल पसरलेल्या आपल्या भारतवर्षातील हजारोहजार साधकांना, भक्तांना, मुमुक्षूंना व जिज्ञासूंना सिद्धयोगांतर्गत शक्तिपातयोगाची दीक्षा देऊन सिद्धयोगसाधनगंगेचा जो प्रवाह प्रवाहित केला, ती सिद्धयोग अर्थात् शक्तिपातयोगसाधनगंगा परमहंस परिव्राजकाचार्य श्रीगंगाधरतीर्थ-स्वामीमहाराज, परमहंस परिव्राजकाचार्य श्रीनारायणतीर्थदेवस्वामीमहाराज, परमहंस परिव्राजकाचार्य श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थस्वामीमहाराज, परमहंस परिव्राजकाचार्य श्रीलोकनाथतीर्थस्वामीमहाराज, परमपूजनीय श्रीगुळवणी-महाराज यांच्यापासून संप्रदायक्रमाने व परंपरेने आजपर्यंत वाहत आली असून या परंपरेची अक्षुण्णधारा त्यांच्या अनुज्ञेप्रमाणे "**ना आदिगुरु शंकरा-। लागोनि शिष्यपरंपरा। बोधाचा हा संसरा। जाला जो आमुते।।१८.१७५९।। तो हा तूं घेऊनि आघवा कळीं। गिळितया जिवां। सर्व प्रकारीं धावां। करीं पां वेगीं।।१७६०।।**" या श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी "श्रीज्ञानेश्वरीत" सांगितलेल्या न्यायाने पुढेही साधनयोग्य अर्थात् कृतियोग्य (Practical) रीतीने माझ्याकडून प्रवाहित होत असून, या सिद्धयोगसाधन- गंगेत अनेकानेक साधक-भक्त-मुमुक्षुजन सुस्नात होऊन आपले जीवन धन्य व कृतार्थ करण्यासाठी मार्गस्थ होत आहेत, ही परमभाग्याची गोष्ट आहे.

श्रीसद्गुरुनाथमहाराज हे ज्याप्रमाणे बोधाच्या अर्थात् दीक्षेच्या ऐश्वर्याचा विस्तार आपल्या अमोघ संकल्पाप्रमाणे माझ्याकडून करवून घेत आहेत त्याचप्रमाणे त्यांच्याच इच्छेने या संप्रदायसिद्धपरंपरेने विभूषित झालेल्या सिद्धयोगसाधनगंगेचे निखळ शास्त्रीय स्वरूप साधकांना व अभ्यासू वाचकांना उपलब्ध व्हावे म्हणून त्यांनी कितीतरी ग्रंथ माझ्याकडून लिहून घेतले. आत्तापर्यंत प्रसिद्ध केलेल्या सर्व ग्रंथांपेक्षा या ग्रंथाचे स्वरूप सर्वस्वी निराळे असून ते शक्तिपातयोगाच्या किंवा सिद्धयोगाच्या उच्च स्तरावरील अभ्यासाने युक्त असे आहे. जरी हा सर्व अभ्यास किंवा त्याचे स्वरूप हे अत्यंत दुरूह असले तरी श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी "अनुभवामृतात" "शिवशक्तिसमावेशें। मियां नमन केलें ऐसें। रंभागर्भ आकाशें। रिगाला जैसा।।१.६४।।" असे म्हणून शिव व शक्ती यांच्या समावेशाचा व तद्वारा नमनाचा म्हणजे अंतिम सामरस्यसिद्धीचा जो अनुत्तर, एकमेवाद्वितीय, अलौकिक व अपूर्व सिद्धांत मांडला आहे, त्याचा उलगडा करून घ्यावयाचा असेल व सिद्धयोगाचे किंवा शक्तिपातयोगाचे अनुत्तरस्वरूप आकळावयाचे असेल तर महामाहेश्वराचार्यवर्य श्रीअभिनवगुप्त, श्रीसोमानंद, श्रीशंभुनाथ, श्रीजयरथ, श्रीक्षेमेंद्र, श्रीउत्पलदेव, श्रीवसुगुप्त इत्यादि कौल, त्रिक, स्पंद, प्रत्यभिज्ञा, त्र्यंबक किंवा तत्सम मार्गासंबंधी लिहिलेल्या ग्रंथांचा अभ्यास करणे नितांत आवश्यक असून या धारणेपोटीच हा ग्रंथ प्रसिद्ध करीत आहे."**कानडेचि अभ्यासावे निरंतर**," या श्रीसमर्थरामदासस्वामीमहाराजांनी सांगितलेल्या न्यायाने साधक-भक्त-वाचकांनी या ग्रंथाचा आस्वाद घ्यावा. त्याचप्रमाणे सिद्धयोगात श्रीगुरुकृपेने आत्मशक्ती कुंडलिनी जागृत होऊन योगसाधन सहजतेने आपोआप होत असल्यामुळे त्यात पुरुषार्थसंपन्न अभ्यासाचे कारण पडत नाही; मात्र साधकाला जागृत कुंडलिनी शक्तिरूप श्रीसद्गुरूंना शरणागतसंपन्न होऊन साधन करावे लागते. या दृष्टीने सिद्धयोगाच्या साधकांनी या ग्रंथाचा अभ्यास करून सार ग्रहण करावे.

या सारग्रहण करण्याच्या दृष्टीने "तंत्रवटधानिका" या ग्रंथाचा काळजीपूर्वक व साक्षेपाने अभ्यास केला म्हणजे महामाहेश्वराचार्यवर्य श्रीअभिनवगुप्त यांनी रचलेला हा ग्रंथ आकाराने लहान असला तरी

सिद्धयोगसाधन शास्त्राचे उच्च स्तरीय मौलिक सिद्धांत त्यात ग्रथित झालेले असल्यामुळे त्याचा महिमा अपूर्व आहे, हे लक्षात येते. मुळात श्रीअभिनवगुप्त यांनी "श्रीतंत्रालोक" नावाचा आकर म्हणजे अत्यंत विस्तृत, श्रेष्ठ व सर्वांगपरिपूर्ण असा ग्रंथ लिहिला असून त्यांनीच "तंत्रसार" या ग्रंथात त्याचे सार लिहिले असून या साराचेही सार "तंत्रवटधानिका" या ग्रंथात त्यांनी ग्रथित केले आहे. प्रो.डॉ.श्री. कांतिचंद्र पांडे यांनी "ABHINAVAGUPTA" "AN HISTORICAL AND PHILOSOPHICAL STUDY" या ग्रंथात "तंत्रसार" व "तंत्रवटधानिका" या ग्रंथाबद्दल असे म्हटले आहे की, "These two, as their names imply, are the summaries of the Tantraloka The last is a briefer summary than the first. It is like a seed of the huge tree of the Tantraloka."

"तंत्रवटधानिका" अर्थात् तंत्ररूपीवटवृक्षाचे बीज या ग्रंथाची तीन आन्हिके असून त्या प्रत्येक आन्हिकात ३७, १९ व ४३ इतके मिळून ९९ श्लोक आहेत. या ग्रंथातील पहिल्या आन्हिकात बंधनाचे कारण अज्ञान असून बंधन म्हणजे पुनर्जन्म होय (१.२) असे सांगून देहात्मभाव छिन्नभिन्न झाल्यावर आत्मवस्तू प्रकाशित होते (१.७) व ही आत्मवस्तू म्हणजे स्वतंत्र, सर्वशक्तिमान् सर्वात्मा व सृष्टीभासविणारा शिव किंवा शिवतत्त्व होय असे सिद्धांतरूपाने प्रतिपादन केले आहे. श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी ज्या नमनासाठी अर्थात् अंतिम सामरस्यसिद्धीसाठी शिवशक्तीचा समावेश किंवा एकत्रिकरणाची अगर संघट्टाची जी प्रक्रिया होणे नितांत आवश्यक आहे म्हणून "अनुभवामृतात" साररूपाने प्रतिपादित केले आहे, त्यातील शिवाचे किंवा शिवतत्त्वाचे अनुत्तर स्वरूप काय आहे हे पाहणे नितांत आवश्यक आहे. म.म.श्रीगोपीनाथ कविराज यांनी "**तांत्रिक वाङ्मयमें शाक्तदृष्टि**" या ग्रंथात "**परमशिव की पृष्ठभूमि**" या लेखात हे अत्यंत गहनगंभीर व परम रहस्यमय असे शिवस्वरूप किंवा शिवतत्त्व उलगडून दाखविताना असे म्हटले आहे की, "अद्वैत

सूफी-साहित्यामध्ये परमात्म्याच्या तीन यत्रांचे विवरण केलेले दृष्टीस पडते. त्यातील पहिली यात्रा ही परमात्मा बहिर्मुख झाल्यावर अविद्येच्या अवलंबनाद्वारा जीवभाव धारण करून मनुष्यभावाच्या प्राप्तीपर्यंतची असते. दुसरी यात्रा ही मनुष्यभावात ज्ञानप्राप्तीच्या द्वारा अविद्येला दूर करून पुन्हा सचेतनभावाने निजभाव किंवा परमात्मभावाच्या प्राप्तीपर्यंत आणि सोऽहंरूपात आपल्या बोधस्वरूपाचा पूर्ण परिचय होईपर्यंतची असते. या दोन्ही यात्रांची चर्चा अध्यात्म साहित्यामध्ये सर्वत्र प्रचलित आहे. यातील पहिली यात्रा ही ज्ञानाची व दुसरी यात्रा अज्ञानाची आहे. परमात्मा हे अज्ञानाचे ग्रहण करीत असतात. परमेश्वर हेच जीवभाव धारण करीत असतात. आणि शेवटी तेच मनुष्य शरीर धारण करीत असतात चैतन्याचा विकास संपादन करणे हा परमात्म्यांचा यामागील एकमात्र उद्देश आहे. यासाठीच देहधारण आणि चौऱ्यांशी लाख योनींच्या द्वारा क्रमविकास करून घेणे हे आवश्यक आहे. या क्रमविकासामुळेच देह आणि चैतन्य यांचा विकास पूर्ण होऊन मानवीय सत्तेची अभिव्यक्ती होणे सहज शक्य आहे. तेव्हा मानवाला स्वतःला पूर्णरूपात सचेतन भावामध्ये जाणून घेण्याची संधी प्राप्त होते, याचे कारण असे आहे की, तेव्हा मानवाच्या अहंभावाचा विकास झालेला असतो. परंतु संधी प्राप्त झाल्यावरही मानव स्वतःला स्वतःच्या अहं रूपामध्ये जाणून घेऊ शकत नाही. क्रमविकासामुळे विकसित ज्ञानावरील संस्काराचे घनीभूत आवरण हे यामागील कारण आहे. हे आवरण दूर केल्याशिवाय मानवाला आत्मज्ञानाची परिपूर्ण स्फूर्ती होणे शक्य नाही. आवरण दूर झाल्याबरोबर मानवाचा क्रमाने देह, इंद्रिय, प्राण, मन, बुद्धी इत्यादिंच्या प्राकृत सत्तेचा किंवा या सत्तेमुळे निर्माण झालेला अहंभाव नाहीसा होतो, या चरम स्थितीमध्ये हा मानव अहंभाव शून्य होऊन आपल्या आपणच अर्थात् स्वयं प्रकाशमान होतो किंवा प्रकाश निर्माण करीत असतो.

या दोन्ही यात्रांमुळे आत्मा हा आपल्या सर्वज्ञत्व, सर्वकर्त्तृत्व आणि अन्यान्य सर्व भागवत गुणांच्या प्रकटीकरणाचा अनुभव घेत असतो आणि स्वतःची भगवत्सत्तेमध्ये ज्ञानपूर्वक प्रतिष्ठा प्राप्त करून घेतो. परमात्म्याच्या

विषयामध्ये वस्तुतः बोध आणि अबोध हे पृथक् किंवा भेदरूपाने ग्राह्य धरलेले नाहीत परंतु या विषय समजण्यात सुलभता व्हावी यासाठी केलेल्या विश्लेषणात असे म्हटलेले आहे की, ज्याप्रमाणे एका दृष्टीने अर्थात् मताप्रमाणे बोध आणि अबोध यात कोणताही फरक नाही, तर दुसऱ्या दृष्टीने किंवा मताप्रमाणे परमात्म्यामध्ये बोध आणि अबोध या दोन्ही भिन्न भिन्न स्थिती नित्य अवस्थित असतात. या दोहोंमधील अबोध स्थितीला अर्थात् अज्ञानदशेला नित्य सुषुप्ती किंवा जडभाव म्हणणे अधिक योग्य आहे. ही सुषुप्ती अवस्था किंवा जडभावदशा नाहीशी झाल्यावर अर्थात् या दशेचा भंग झाल्यावर परमात्म्याचा जडभाव नाहीसा होऊन तो जडरूप धारण करतो, तसेच चिद्भावाचा उन्मेष किंवा अंकुर जीवरूप धारण करीत क्रमविकासाच्या मार्गामध्ये अग्रेसर होत असतो. या मार्गामध्ये चित्सह म्हणजे चैतन्यशक्ती कुंडलिनीशी अर्थात् जीवभावाशी असणारा जडाचा संबंध म्हणजेच अचेतन देहाशी असणारा संयोग हा मनुष्यदेह धारण करेपर्यंत जीवाच्या क्रमिक उन्नतीमध्ये आवश्यक असतो. चैतन्याचा क्रम-विकास किंवा क्रम-जागरण हाच याचा एकमात्र उद्देश आणि नियामक अर्थात् नियमन करणारा आहे. दुसऱ्या दृष्टीमध्ये बोधाची जी दुसरी स्थिती आहे, ती स्थिती नित्यजागृत स्थितीच्या रूपात वर्णिलेली आहे. ही अवस्था नित्यसिद्ध, स्वप्रकाश, चैतन्याची अवस्था असून ती महासुषुप्तीहून भिन्न आहे. या अवस्थेमध्ये आत्मा हा स्वभावतः आपल्या अनावृत अर्थात् आवरणरहित, चेतन व अनंत शक्तिसंपन्न परमात्म्याच्या रूपामध्ये अनुभव करीत असतो. यातील पहिली अवस्था प्रकृतीची परमावस्था आहे आणि ही अवस्था पुरुषाची परमावस्था आहे; परंतु मुळात प्रकृती आणि पुरुष हे अभिन्न अर्थात् एकरूप आहेत. प्रथमावस्थेमध्ये अहंबोधाचा उदय होत नाही, वस्तुतः या अवस्थेमध्ये कोणत्याही बोधाचा उदय होत नाही. महासुषुप्ती अवस्थेचा भंग झाल्यानंतरच त्या बोधाचा उदय आणि पुष्टी होत असते. दुसऱ्या अवस्थेमध्ये अहंबोध नित्य पूर्ण अहं रूपामध्ये प्रतिष्ठित होत असतो.

सूफी लोकांच्या मतानुसार दुसऱ्या यात्रेनंतर कोठे कोठे एका तिसऱ्या

यात्रेचीही माहिती होते किंवा जाणीव होते. अशी एक यात्रा आहे, की जिच्यामध्ये भगवत्सत्ता ही आपल्या स्वरूपात बाहेर निघून येते आणि दुसरी एक अशी यात्रा आहे की जिच्यामध्ये भगवत्सत्ता बाहेरून अंतर्मुख होऊन आपल्या स्वरूपामध्ये प्रवेश करीत असते. भगवत्सत्ता आपल्या स्वरूपामध्ये प्रविष्ट झाल्यानंतर त्या स्वरूपामध्ये आतल्या आत जी परम अव्यक्ताच्या दिशेने जाणारी यात्रा आहे, ती तिसरी यात्रा समजावी.

परम श्रीशिवांच्या पृष्ठभूमीच्या रूपामध्ये ज्याचा उल्लेख केला गेलेला आहे, त्याचा पत्ता अर्थात् ठावठिकाणा या तिसऱ्या यात्रेच्या मार्गामध्येच उपलब्ध होत असतो. या यात्रेची एक सीमा किंवा मर्यादा आहे, हे म्हणणे अनावश्यक आहे. ही यात्रा जरी असीम असली तरी मनुष्य-देहामध्ये स्थित होऊन जर साधक या यात्रेचा यात्रिक बनला असेल तर एका परम अव्यक्ताच्या द्वारावर जाऊन तेथेच स्तंभित होणे हे अत्यंत आवश्यक किंवा अवश्यंभावी आहे. यामुळेच अति-सूक्ष्मदर्शी ख्रिस्ती अध्यात्मविद् अर्थात् अध्यात्म जाणणाऱ्या योग्यांमधील काही जणांनी God पासून अर्थात् परमात्म्यापासून God head अर्थात् ईश्वराचे शीर्ष पृथक् किंवा वेगळे करून त्याचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ज्ञान आणि विज्ञान दृष्टीच्या निर्मळतेच्या तारतम्यानुसार काही योगिजनांना थोड्या अंतरावर पुढे जाऊन मौनाचे अवलंबन करणे अत्यावश्यक झाले तर काही योगिजन यांच्यापेक्षा थोडे अधिक दूर अग्रेसर होण्यास समर्थ झालेले आहेत. याचे कारण असे आहे की, अव्यक्त हे नेहमी अव्यक्तच असते. त्याला व्यक्त करण्याचे कितीही प्रयत्न केले तरीही शेवटी अव्यक्त हे अव्यक्तच राहाते. "**यतो वाचो निवर्त्तन्ते अप्राप्य मनसा सह।**" याचा अर्थ असा आहे की, त्या अंतिम आत्मास्थितीचे वर्णन करता येण्यासारखे नसल्यामुळे वाणी तेथून मनासह माघारी फिरते.

हे जरी अतीव गुह्य अर्थात् रहस्यमय तत्त्व असले तरी आपले अध्यात्मशास्त्र या तिसऱ्या यात्रेचा ठावठिकाणा देण्यामध्ये जराही चुकलेले नाही. विशेष करून तांत्रिक शास्त्र हे गुह्यतत्त्वाचे प्रतिपादक असल्यामुळ ते या मार्गाने अधिक दूरपर्यंत अग्रेसर झालेले आहे, ही गोष्ट प्रतीत होत

असते. अन्य शास्त्रांमध्येही काही ठिकाणी या तिसऱ्या यात्रेचा परिचय मिळत नाही, अशीही गोष्ट किंवा बाब नाही.

आगमशास्त्रामध्ये अर्थात् परंपरेने चालत आलेल्या शास्त्रांमध्ये साधारण दृष्टीने परम श्रीशिवाची ही अवस्था ही पूर्णतेचा परिचय देणारी चरम अवस्था मानलेली आहे. या अवस्थेमध्ये शिव-शक्तींचे सामरस्य किंवा साम्य प्रकट होत असते. श्रीशिवभाव अभिव्यक्त प्रकाशाचा भाव आहे. ज्याच्या आश्रयाने सर्वकाही प्रकाशित होत असते, हाच तो परमप्रकाश आहे. तसेच काहीही शिल्लक न राहिल्यावरही तो स्वप्रकाश असल्यामुळे निरंतर स्वतःमध्येच स्वयं प्रकाशमान होत असतो. या स्वयंप्रकाशाची जी आत्मविश्रांती अर्थात् अहंरूपाने जे विमर्शन किंवा जो विचार आहे, तीच शक्ती आहे. शक्तीच्या स्फुरणापासूनच किंवा स्फुरणातूनच या अखिल विश्वाचा उदय होत असतो. केवळ इतकेच नव्हे; तर विश्वाची स्थिती आणि लय हेही शक्तीच्या स्फुरणामुळेच होत असतात. यामुळे शक्तीच्या उन्मेषावस्थेमध्ये व या समग्र प्रकाशामध्ये विश्वाचा आभास दिसून येतो. हा आभास अहं रूपामध्ये गृहीत आहे किंवा इदं रूपामध्ये गृहीत आहे, ही दुसरी गोष्ट आहे. परंतु या आभासाची सत्ता ही महाप्रकाशाचा साभास प्रकाशाच्या रूपामध्ये निर्देश करीत असते. हा आभास राहिला नाही तर तो प्रकाश निराभासरूपाने प्रकाशमान होत असतो. लोकदृष्टिकोनातून ज्याला सृष्टी असे म्हणतात ती या महाप्रकाशरूपी पूर्ण अहंची स्वातंत्र्यशक्तीने कल्पिलेली इदंरूपी केवळ बाह्य सत्ता आहे. ही सत्ता सर्वप्रथम शून्यरूपामध्ये अर्थात् शून्यातिशून्य रूपामध्ये प्रकाशित होऊन क्रमशः स्तरास्तरामध्ये स्वतःला अनंतभावाने प्रकट करीत असते.

या विश्वातीत आणि विश्वमय पूर्ण तसेच परम श्रीशिवसत्तेच्या मध्यामध्ये किंवा पृष्ठभूमीमध्ये काय आहे? याचे शास्त्राधारे आणि श्रीगुरुशक्तीच्या साहाय्यतेने काही प्रमाणात समजावून घेण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत. हे आपाततः अर्थात् सहजरीतीने गुह्यतत्त्वाचे आवरण दूर करणे आहे अर्थात् तत्त्व स्पष्ट करणे आहे. असे प्रतीत होत असले तरी जे वास्तविक यथार्थ गुह्यतत्त्व आहे, त्याच्या आवरणाचे अपसारण केले

जाऊ शकत नाही. हे केवळ परम श्रीशिवाच्या अवस्थेच्या अंतर्गत असलेल्या अतिसूक्ष्म स्तराचे विश्लेषण आहे. या विश्लेषणामध्ये प्रतीत होणारा क्रम केवळ कालगत क्रम नसून बोधाचा किंवा ज्ञानाचा क्रम आहे. हा क्रम गृहीत धरला नाही तर देहबद्ध चैतन्य आपल्या आत स्थित असलेल्या अनंत वैचित्र्याच्या काही अंशाला सचेतन रूपामध्ये धारण करू शकत नाही.

ब्रह्म सच्चिदानंद स्वरूप आहे ही गोष्ट शास्त्रामध्ये प्रसिद्ध आहे. वस्तुतः सत्, चित् आणि आनंद हे तिन्ही अभिन्न भाव आहेत. तरीही यातील प्रत्येक भाव एका विशिष्ट भावाचा द्योतक आहे. सद्भाव असद्भावापासून पृथक् किंवा वेगळा होऊन सन्मात्ररूपाने विद्यमान राहू शकतो आणि चिद्भावासह अभिन्न रूपामध्येच स्वतःला प्रकट करीत असतो. याप्रमाणेच चिद्भाव आनंदाच्या अतीत परमसत्तेमध्ये विराजमान होऊ शकतो. तसेच दुसऱ्या दृष्टींमध्ये अर्थात् अभिन्न दृष्टीमध्ये हा चिद्भाव आनंदाशी एकरूप होऊन स्वतःला प्रकट करीत असतो. पूर्णतत्त्वाची जी गंभीरतम स्थिती आहे, तेथे सत्, चित् आणि आनंद यांची कल्पनाही केली जाऊ शकत नाही. या गंभीरतम सन्मात्रेच्या स्थितीमध्येच आत्मप्रकाशरूपामध्ये यांचीच एक कला किंवा शक्ती बाहेर पडत असते. त्या शक्तीचा उल्लेख तांत्रिक लोकांनी "चित्" या नावाने उल्लेख केलेला आहे. एका प्रकाराने पाहिले असता हा चिद्भाव पूर्णसत्याच्या बहिरंग भावाचा आदिप्रकाश आहे. तांत्रिक साहित्यामध्ये हा चिद्भाव "अनुत्तर" या नावाने वर्णिलेला आहे. निजसत्ता जेव्हा सत् पासून चिद्रूपामध्ये बाहेर पडते तेव्हा "चित्" ची अवस्था असते. परंतु जे बहिर्मुखस्पंदन चिद्भावाचे प्रकाशक आहे, ते चिद्भावामध्ये पूर्ववत् कार्य करीत असते. या स्पंदनामुळेच चित् हे निजसत्तेपासून आंशिकरूपाने बाहेर पडून आनंदरूपाने स्थिती प्राप्त करीत असते. परंतु येथे ही गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, जे शुद्ध सन्मात्र आहे, ते एका दृष्टीने निरचंद असूनही दुसऱ्या दृष्टीनुसार स्पंदनहीन नाही. हे केवळ बाह्य स्पंदन आहे. याच्या प्रभावाने सत् हे चिद्रूपामध्ये प्रकाशित होत असते. परंतु याच्या आभ्यंतर स्पंदनाचा

पत्ता आपल्याला कळू शकत नाही अर्थात् आपल्याला आभ्यंतर स्पंदनाची जाणीव होऊ शकत नाही. आभ्यंतर स्पंदनाचा स्वीकार केल्यानंतरही हे स्पंदन विचारयोग्य नाही. चित् आदि प्रत्येक स्थितीमध्ये अंतःस्पंदन आणि बाह्यस्पंदन हे दोन्ही समानरूपाने विद्यमान असतात. यामुळे "चित्" ज्याप्रमाणे स्पंदनवश आनंदाच्या अभिमुख अर्थात् सामोरे आहे तसेच दुसऱ्या बाजूने "चित्" हे "सत्" च्याही सामोरे आहे. मानवाच्या चित्तामध्ये ज्याप्रमाणे आपण अंतर्मुख आणि बहिर्मुख या दोन्ही वृत्तींचा प्रत्यक्ष अनुभव करू शकतो त्याचप्रमाणे परमसत्याच्या आत चित् आणि आनंद या दोन अंशांचे हे द्विविध स्पंदन गृहीत होत असते. बहिःस्पंदनामुळे जेव्हा चित् पासून द्वितीय चित्‌चा अविर्भाव होत असतो तेव्हा बहिर्मुख झालेले प्रथम चित् त्या द्वितीय चित्‌च्या आत आपले प्रतिबिंब पाहू शकते. तसेच हे प्रतिबिबं पाहून त्याला आपल्या सत्तेच्या रूपामध्ये जाणून घेऊ शकते. शास्त्रामध्ये यालाच "आनंद" असे म्हटलेले आहे. ज्याप्रमाणे आरशामध्ये आपले रूप पाहिले जाते तसेच त्या रूपाची पृथक् जाणीव होऊनही "ही माझीच सत्ता आहे" हे ज्ञान होत असते त्याप्रमाणे चित्‌पासून विश्लिष्ट अर्थात् निराळ्या किंवा पृथक् चित्‌सत्तेमध्ये जेव्हा चित् स्वतःला पाहू शकते तेव्हा ते त्याचा आनंदाच्या रूपात अनुभव घेत असते. प्रत्यक्षात् हे पृथक् असे काहीही नाही. आपलीच सत्ता आहे. ज्याप्रमाणे "सत्" पासून "चित्" भिन्न नाही परंतु तरीही भिन्न आहे त्याचप्रमाणे "चित्" पासून "आनंद" पृथक् नाही परंतु असे असूनही त्याला पृथक् रूपामध्ये जाणून घ्यावे लागते.

"चित्' चे शास्त्रीय नाव "अनुत्तर" असे आहे अर्थात् "अ" हे वर्णमालेचे प्रतीक आहे. सर्व वर्णांच्या आरंभी "अ" वर्णाच्या द्वारे "अनुत्तरालाच" ध्येय किंवा लक्ष्य केलेले आहे. त्याचप्रमाणे "आ" हा वर्ण आनंदाचे प्रतीक आहे. सत्, चित् आणि आनंद हे अखंड रूपामध्ये गृहीत असल्यामुळे एका अद्वैत ब्रह्मरूपामध्ये आपल्या निकट आपणच प्रकाशित होत असतात. जरी ही ब्रह्मसत्ता निरंश अर्थात् अंशरहित असली तरीही समजून घेण्यासाठी सोपे जावे म्हणून या सत्तेच्या दोन

अंशांची कल्पना केली जाते. सन्मात्र हे सदा अव्यक्त आणि अव्याकृत अर्थात् विकृतीविरहीत आहे. हीच चिरनिगूढ सत्याची गंभीरतम स्थिती आहे. या स्थितीचे आलंबन करून अर्थात् आधार घेऊन त्याचा प्रकाश चिद्रूपामध्ये विराजमान आहे . हे चित् प्रत्यक्षात चित्शक्तीचेच स्वरूप आहे. तसेच हे जेव्हा आपल्या स्वतःलाच अभिमुख होते तेव्हा अनुकूल संवेदनाच्या रूपामध्ये प्रकाशमान होत असते. त्यावेळी यालाच "आनंद" असे म्हणतात. हे आनंद ह्लदिनी शक्तीचेच स्वरूप आहे. चित् अवस्थेमध्ये अनुकूल आणि प्रतिकूल भाव राहत नाहीत. परंतु आनंदावस्था नित्य अनुकूल भावमय आहे. यात प्रतिकूल भाव नाही. चित् सत्तेमध्ये एकच एक आहे, दुसरे कोणीही नाही. आनंद सत्तेमध्ये एकच दुसऱ्याचे सोंग रचून आपल्याच बरोबर क्रीडा करीत असतो. ज्या अवस्थेचे येथे वर्णन केले जात आहे, ती सृष्टीच्या आधीची अवस्था आहे. सृष्टीच्या निर्मिती होण्याआधीची ही अवस्था म्हणजेच सृष्टीच्या संपूर्ण सामग्रीच्या अभिव्यक्तीची पूर्वावस्था आहे. या आनंदापासूनच जिला आपण सृष्टी म्हणतो तिची अभिव्यक्ती होत असते. यासाठीच "**आनन्दाद्ध्येव खाल्विमानि भूतानि जायन्ते**" असे श्रुतीमध्ये म्हटलेले आहे. युगलभावाशिवाय आनंद असत नाही तसेच आनंदभावाशिवाय सृष्टी किंवा निर्मिती होऊ शकत नाही. "**स एकाकी न अरमत। तदात्मानं द्विधा अकरोत्**" असे बृहदारण्यक उपनिषदामध्ये म्हटलेले आहे. "अ" पासून "आ" ची अभिव्यक्ती होणे आणि एकापासून दोघांची अभिव्यक्ती होणे ही एकच गोष्ट आहे. ही आत्मरमण किंवा आत्माराम अवस्था आहे. ब्रह्मवेत्ते या अवस्थेचा आस्वाद घेत असतात.

ज्याप्रमाणे कारंज्यापासून किंवा फवाऱ्यापासून जलकण निरंतर उसळून बाहेर पडत असतात त्याचप्रमाणे या आनंदरूप स्रोतापासून आनंदकण हे निरंतर उसळून बाहेरच्या दिशेला धावत असतात. प्रत्यक्षात बाहेर एखाद्या नावाने कोणतीही सत्ता नाही, तरीही प्रतिभासाच्या रूपामध्ये एक कल्पित बाह्यसत्ता मानावी लागते. वस्तुतः ही आनंद-सत्ता केवळ अभावच आहे, अन्य काहीही नाही. आनंदाचे सूक्ष्म कण आनंदाच्या मूळ उद्गमस्थानापासून

बाहेर पडताच एका आवरणाने आच्छन्न किंवा आवृत होत असतात. तसेच हे सूक्ष्मकण आपल्या अंतःस्थित आनंदसत्तेचा पुन्हा अनुभव घेऊ शकत नाहीत. शास्त्रीय परिभाषेमध्ये हाच इच्छेचा विकास आहे. "इ" हे याचे प्रतीक आहे. जेथे पूर्णआनंद आहे आणि शून्य अभाव आहे, तेथे इच्छा नावाची कोणतीही शक्ती कार्य करू शकत नाही. इच्छेच्या विषयालाच "इष्ट" असे म्हणतात. इच्छेचा विषय हा आनंदाशिवाय अन्य काहीही नाही. कारण इच्छा ही केवळ आनंदाची अपेक्षा करीत असते किंवा आनंदावरच प्रेम करीत असते. इच्छा ही आनंदाला प्राप्त करून घेऊन चरितार्थ अर्थात् कृतार्थ होते व स्वतःमध्येच स्वतः विलीन होऊन जाते. प्रत्यक्षात इच्छा ही आनंदाचे अन्वेषण करण्याची किंवा शोध घेण्याची शक्ती आहे. इच्छेपासूनच जगताची सृष्टी होते हे सांगणे अनावश्यक आहे. यामुळेच संपूर्ण जगतामध्ये सर्वत्रच अन्वेषणाचा एक भाव स्थिर राहातो. अणु-परमाणूपासून सूर्य-मंडळ किंवा नक्षत्र-मंडळापर्यंत स्थूला-पासून कारणजगतापर्यंत सर्वत्र प्रकट रूपाने तसेच गुप्तरूपाने एक आकांक्षेचा अर्थात् इच्छेचा परिचय प्राप्त होत असतो. ही हरविलेल्या धनाला प्राप्त करून घेण्याच्या एका विशेष प्रकारच्या वासनेशिवाय आणखी काहीही नाही. हे हरविलेले धन इच्छेचा विषयीभूत आनंदाशिवाय अन्य काहीही नाही. जोपर्यंत आनंदाची प्राप्ती होत नाही तोपर्यंत अन्वेषणाची अर्थात् शोधाची समाप्ती होऊ शकत नाही. यामुळे इच्छेची तृप्ती तसेच पूर्णत्वाची प्राप्ती होत नाही.

आनंदरूप ही इष्ट वस्तू यावेळीही अमूर्त्त अवस्थेमध्ये विद्यमान असते. जेव्हा इच्छाशक्ती घनीभूत होते अथवा संवेगाच्या द्वारे स्पंदित होते; तेव्हा 'ईशन शक्तीचा' उदय होत असतो. "ई" हे याचेच प्रतीक आहे. ही ईशन शक्तीच या शक्तीचा प्राण आहे. वस्तुतः ही इच्छेशिवाय अन्य काहीही नाही. ही इष्ट वस्तू यावेळी एषणीय आहे अर्थात् इच्छेचा विषय आहे. हिच्या परावस्थेमध्ये जेव्हा हे गुप्त धन प्रगट होत असते तेव्हा ते ज्ञेय रूपात स्वतःला प्रगट करीत असते. यावेळी इच्छाशक्ती ही ज्ञानशक्तीचा आकार धारण करीत असते. या ज्ञानशक्तीचेच दूसरे नाव

"उन्मेष" असे आहे. "उ" हे या उन्मेषाचेच प्रतीक आहे.

उन्मेषरूप ज्ञानशक्ती आपल्या विषय ज्ञानसत्तेचे प्रकाशन करीत असते. ज्याप्रमाणे इच्छा आणि एषणीय हे पृथक् किंवा भिन्न नसतानाही पृथक् असल्याप्रमाणे प्रतीत होत असतात त्याप्रमाणे ज्ञानापासून ज्ञेय हे पृथक् नसतानाही पृथक् असल्याप्रामाणे भासते. ज्ञानशक्ती ही ऊकाराच्या द्वारे वर्णिलेली आहे तसेच तिचे विशेष ज्ञेय ऊकाराच्या द्वारे वर्णमालेमध्ये गुंफलेले आहे. हा "ऊ" प्रत्यक्षात "उ" ची घनीभूत अवस्था आहे. शास्त्रीय परिभाषेनुसार या "ऊ" लाच "ऊनता" किंवा "ऊर्मी" असे म्हणतात

ज्याप्रमाणे जलाहून बर्फ हे स्वरूपतः अभिन्न आहे त्याचप्राणे "ऊ"कार हा "उ"काराहून अभिन्न आहे. ज्याप्रमाणे जल हे घनीभूत होऊन बर्फाचे रूप धारण करीत असते त्याप्रमाणेच ज्ञानशक्ती ही घनीभूत होऊन ज्ञेयाचे रूप धारण करीत असते. बर्फ हे घनीभूत असल्यामुळे जलापासून पृथक् प्रतीत झाले तरी प्रत्यक्षात ते जलच असते तसेच हे बर्फ जलापासून उत्पन्न होऊन जलाचा आश्रय घेऊन विद्यमान असते. त्याचप्रमाणे ज्याला आपण ज्ञान असे म्हणतो अर्थात् जो ज्ञानाचा विषय आहे तो ज्ञानाहून भिन्न नाही. ही ज्ञानाचीच मूर्त अवस्था आहे. तसेच ज्ञानाचा विषय हा ज्ञानापासून उत्पन्न होऊन आणि ज्ञानाचा आश्रय घेऊन स्वतःला प्रकट करीत असतो.

ज्ञेय पदार्थ ज्ञानापासून भिन्न नाही; परंतु अविद्येमुळे पृथक् किंवा भिन्न असल्याप्रमाणे प्रतीत होत असतो. अविद्येची निवृत्ती झाल्यावर ज्ञेय पदार्थ ज्ञानापासून पृथक् प्रतीत होत नाही. ज्या अविद्येची येथे चर्चा केलेली आहे त्या अविद्येच्या प्रभावामुळे ज्ञानापासून ज्ञेयाची पृथक् सत्ता प्रतीत होते. हे शास्त्रानुसार क्रियाशक्तीचे दुसरे नाव आहे. या क्रियाशक्तीच्या प्रभावामुळे ज्ञानापासून ज्ञेय पृथक् होत असते. आमच्या याआधी विर्णिलेल्या दृष्टांतामध्ये जलापासून उत्पन्न झालेला बर्फाचा तुकडा जलामध्ये जोपर्यंत बुडलेला असतो तोपर्यंत क्रियाशक्तीचा व्यापार सुरू झालेला नाही हे समजावे. जेव्हा हा बर्फाचा तुकडा पाण्यापासून दूर केला जातो त्यावेळी

जलापासून बर्फ पृथक् रूपाने प्रतीत होतो. तेव्हा अविद्यारूपी क्रियाशक्तीचा खेळ सुरू झालेला आहे, असे समजावे. "ए," "ऐ", "ओ" आणि "औ" हे वर्णमालेमधील या क्रियाशक्तीचे प्रकाशक वर्ण आहेत. क्रियाशक्तीच्या अस्फुट, स्फुट, स्फुटतर आणि स्फुटतम या चार अवस्था या चार स्वरवर्णांच्या द्वारे प्रकाशित होत असतात. क्रियाशक्तीचा खेळ जेव्हा पूर्ण होतो, तेव्हा क्रियेची निवृत्ती होत असते.

अशा तऱ्हेने आम्हाला असे प्रतीत होते की, स्पंदाच्या बहिर्मुख संवेगापासून एकानंतर एक विभिन्न शक्तींची अर्थात् कलांची अभिव्यक्ती होत असते. चित्, आनंद, इच्छा, ज्ञान आणि क्रिया या पाच भागामध्ये स्थूल दृष्टीने या शक्ती किंवा कला विभक्त झालेल्या आहेत. प्राचीन महात्म्यांनी श्रीशिव किंवा परमेश्वर या पाच मुखांची कल्पना करून या पाच शक्तींचाच संकेत केलेला आहे. या पाच शक्तींमधील चित् आणि आनंद स्वरूपशक्तीच्याच अंतर्गत येतात. त्या सच्चिदानंद स्वरूपाच्या अंतर्गत आहेत आणि आपेक्षिक दृष्टीने इच्छा, ज्ञान आणि क्रिया या तीन बहिरंग शक्तीच्या रूपाने कल्पिलेल्या आहेत. बहिरंग शक्ती ही त्रिकोणरूपी विश्वयोनी किंवा महामाया आहे. मुळात पाच शक्ती याच शक्ती आहेत. ज्यांना मी स्वरूपशक्ती असे म्हटलेले आहे त्याही शक्तीच आहेत. शक्ती नाही तर केवळ सत्ताच आहे की, जी गुप्तरूपाने त्या अंतरंग शक्तीच्याही अंतःस्थलामध्ये विद्यमान राहते. यामुळे भगवती श्रुतीने असे म्हटलेले आहे की, "**अस्ति इति ब्रुवतोऽन्यत्र कथं तदुपलभ्येते**" असे म्हणून त्या परमशक्तीची स्तुती केली गेलेली आहे. हा शक्तिप्रवाह म्हणजेच स्पंदाचा बहिःप्रवाह आहे, प्रत्येक स्थितीमध्ये एक अंतःप्रभाव आहे, हे म्हणणे अनावश्यक आहे. ज्याप्रमाणे सृष्टीमुखी गती ही बहिर्मुख असते आणि प्रलयाची गती अंतर्मुख असते त्याप्रमाणे ईक्षण हे बहुतकरून बहिर्मुख असते. परंतु ईक्षण हे स्वरूपाच्या दिशेने अंतर्मुख असते. सर्वत्र याच प्रकारे समजावे. अंतर्मुख नसलेली व बहिर्मुख नसलेली अशीही एक स्थिती आहे. येथे या स्थितीच्या संबंधात काहीही सांगितले जाणार नाही. हा वाणीचा अगोचर विषय आहे. यामुळे "अ" पासून "ऊ" पर्यंत

असलेल्या धारेला "प्रवृत्ति-धारा" असे म्हणतात. ही शक्तीची बहिर्मुख धारा आहे; परंतु क्रियाशक्तीच्या पूर्णतेबरोबरच बहिर्मुख धारेचा अंत होतो. यावेळी या अंतर्मुख धारेची स्वाभाविकपणे अभिव्यक्ती होत असते. प्रवृत्तीची धारा ही यावेळी निवृत्तीच्या धारेमध्ये परिणत झाली की, सर्व पृथक् पृथक् अवभासित होणाऱ्या शक्ती किंवा कला या स्पंदनवश एकीभूत होऊन समष्टिभावाला प्राप्त करून घेतात. यांनाच "बिंदू" असे म्हणतात. बिंदू हे संपूर्ण कला किंवा शक्ती यांच्या एकीभूत अवस्थेचे दुसरे नाव आहे. बिंदूची अभिव्यक्ती झाल्यावर हा स्वभावतः अनुत्तर अथवा अकाराचा आश्रय घेऊन प्रकाशित होत असतो. याचे कारण असे आहे की, अकार हे चित्शक्ती किंवा अनुत्तररूप आहे. याचा आश्रय घेऊनच सर्वकाही प्रकाशित होत असते. "**तस्य भासा सर्वमिदं विभाति।**"

याचेच नाव "अंकार" अर्थात् बिंदु-संयुक्त अनुत्तर आहे. पहिल्या बहि स्पंदनाच्या वेगाने जो आविर्भाव होत असतो तो आविर्भाव सन्मात्र किंवा अव्यक्तापासून होत असतो. यानंतर होणारा बहिर्मुख धारेचा निर्गम हा चित् किंवा आकारापासून होत असतो. याची परिणिती "औकारात" अर्थात् चित्शक्तीपासून क्रियाशक्तीपर्यंत पाच शक्तींच्या आविर्भावात अर्थात् प्रकटीकरणात संपूर्ण होते. यावेळी अनुत्तर अर्थात् भगवान् श्रीशिव हे पंचशक्तिसमन्वित झाले अर्थात् बिंदुसंयुक्त झाले. यानंतर जी सृष्टी होणार आहे ती "अ" पासून न होता "अं" पासून होईल. यावेळी हा एक बिंदू विभक्त होऊन स्वतःला दोन बिंदूंमध्ये परिणत करीत असतो. "विसर्ग" हे याचेच दुसरे नाव आहे. यापुढे घेणारी सृष्टी ही वैसर्गिक सृष्टी आहे. ही वैसर्गिक सृष्टी प्रत्यक्षात व्यंजन वर्गाची सृष्टी किंवा निर्मिती आहे. तांत्रिक परिभाषेनुसार हीच तत्त्वसृष्टी आहे. "क" पासून "ह" पर्यंतचे व्यंजन वर्ण हे विभिन्न तत्त्वांचे द्योतक आहेत. हे सर्व प्रतीक मात्र आहे, असे म्हणणे अनावश्यक आहे. जेव्हा या तत्त्वांची अभिव्यक्ती झाल्यावर तत्त्वसृष्टीचे अवसान अर्थात् अंत किंवा समाप्ती होत असते तेव्हा "ह" कार पर्यंत सृष्टी झालेली आहे, असे जाणून घ्यावे.

बैंदवसृष्टीच्या वेळी ज्याप्रमाणे कला किंवा शक्ती या बहिर्मुख वृत्तीनंतर

अंतर्मुख गतीने बिंदूरूप धारण करून अकाराशी संयुक्त होत असतात त्याप्रमाणे या ठिकाणी प्रत्यावर्त्तन क्रमाने हकारापासून हकारापर्यंतची सृष्टी अहंभावामध्ये पर्यवसित होत असते. यावेळी कलासृष्टी आणि तत्त्वसृष्टीचा अंत झाल्यामुळे अहंभावाची अभिव्यक्ती होते. हेच पूर्ण "अहम्" आहे असे म्हणणे व्यर्थ आहे; कारण याचे प्रतियोगी अन्य "अहम्" नाही. सन्मात्र अवस्था ही "अहम्" नाही. हे कथन येथे अनावश्यक आहे. चिदानंद अर्थात् सच्चिदानंद अवस्थेमध्ये "अहम्" नाही तसेच शक्ती किंवा कला यांची सृष्टी जेथे समाप्त होते तेथेही "अहम्" नाही. तत्त्वसृष्टी पूर्ण झाल्यामुळे "अहम्" ची प्रथम अभिव्यक्ती होत असते. या पूर्णाहं तत्त्वामध्ये सर्व तत्त्वे विद्यमान राहतात. समस्त शक्ती यातच राहतात अर्थात् बहिरंग आणि अंतरंग शक्ती तसेच परम अव्यक्त गूढ सत्तासुद्धा या पूर्णाहं तत्त्वामध्येच विद्यमान आहे. प्रत्यक्षात् ही "पूर्णाहम्" परमशिवावस्था आहे, जिच्यासह अभिन्नरूपाने परमशक्ती विराजमान राहते. आपण ज्याला सृष्टी असे म्हणतो ती या परम श्रीशिवांपासूनच उत्पन्न होत असते.

परंतु याची एक स्थूल अवस्था व एक सूक्ष्म अवस्था आहे. आपण अनंत भुवने किंवा समग्र विश्वाला सृष्टी असे समजत असतो. अहंभावापासून इदं भावाचा उदय झाल्याशिवाय ही अवस्था प्राप्त होत नाही. जेव्हा या पूर्णाहंपासून स्वातंत्र्यवश इदंभावाचा प्रथम विकास होतो तेव्हा ही विश्वसृष्टीची सूचना आहे, असे समजावे. परंतु या इदं भावाचा आविर्भाव होण्याआधी एक "अहम्" हाच अनंत अहंरूपामध्ये स्वतःला प्रकट करीत असतो. तेव्हा "**सर्वं खल्विदं ब्रह्म**" या श्रुतिवाक्याची सार्थकता होत असते. यानंतर इंदभावाचे स्फुरण झाल्यावर सर्वप्रथम सर्वशून्यरूप परमाकाशाचा आविर्भाव होत असतो. तसेच याचा आधार घेऊन तो अनंत अहंद्वितीय रूपामध्ये प्रकट होत असतो. ही "इदं सृष्टी" आहे. हे महासमष्टिरूप आहे. या वेळीही कालाचा आविर्भावही झालेला नाही. काळाचा हा पूर्वाभास केवळ महाकालातच झालेला आढळून येतो. यामुळे या सृष्टीमध्येही वास्तविक क्रम नाही. या सृष्टीमध्ये एक अंतःक्रम आहे; परंतु वस्तुतः तोही क्रम

नाही. यामुळे यावेळी अतीत, अनागत आणि वर्तमान (भूत, भविष्य आणि वर्तमान) या तिन्ही काळाची क्रिया राहत नाही. येथे प्रचलित कार्य-कारण भावही राहत नाही. येथे केवळ अनंत विचित्रता राहते. सर्व सत्तेमध्येच सर्व सत्ता अनुस्यूत अर्थात् व्याप्त किंवा ओवलेल्या राहतात. या सत्तांमध्ये देशगत भेद असत नाही; परंतु एक प्रकारचा भेद हा केवळ प्रतिभासमान होत राहतो. यानंतर त्या महासृष्टीपासून खंडसृष्टीचा आविर्भाव होत असतो. याच ऐश्वरिक सृष्टी आहेत. यांमध्ये कालगत, देशगत आणि स्वरूपगत अनंत वैचित्र्य असते. समष्टि-सृष्टी (हिरण्यगर्भ) आणि व्यष्टि-सृष्टी (जीव) या याच्याच अंतर्गत आहेत. महासमष्टि सृष्टी ही याहून भिन्न आहे. महासमष्टि-सृष्टीमध्ये समष्टि-सृष्टीप्रमाणे कर्म, जन्म, मृत्यू, सृष्टी, प्रलय इत्यादि व्यापार होत नाहीत.

येथपर्यंत जे काही सांगितलेले आहे, त्यावरून असे लक्षात येते की, प्रचलित धारणेनुसार परम श्रीशिवापासून विश्वसृष्टी झालेली आहे. ही युक्तियुक्त धारणा आहे, यात काहीही शंका नाही. परंतु प्रत्यक्षात परमशिव-तत्त्वाचे ज्ञान झाल्यावर त्याच्या मध्यवर्ती अवस्थेचे ज्ञान होणे आवश्यक आहे. या अत्यंत गुप्त रहस्याचे मानवी भाषेद्वारा प्रकाशन होऊ शकत नाही, तरीही भगवंतांनी उपदेशिलेल्या तंत्रशास्त्रानुसार अतिसंक्षेपाने या मध्यवर्ती अवस्थेची एक झलक देण्याचा प्रयत्न केला गेलेला आहे."

तंत्रवटधानिकेच्या द्वितीयमाह्निकात श्रीशिवाच्या कृपाप्रसादानेच त्याच्या प्राप्तीचे साधनभूत उपाय सुचतात (२.१) आणि श्रीसद्‌गुरुनाथमहाराजांच्या कृपाप्रसादाने शब्ददीक्षा होऊन अनादि निद्रिस्थ आत्मशक्ती कुंडलिनी अर्थात् आंतरिक सत्ता म्हणजे शक्ती (३.१) जागृत होऊन ज्ञान व समावेश प्राप्त होतो व साधक कृतकृत्य होतो (२. २ ते ८) हे सूचित करून साधकाने श्रीसद्‌गुरुनाथमहाराजांची सेवा सर्वस्व अर्पून करावी, (२.१८-१९) हे आग्रहपूर्वक सांगितले आहे. अशा प्रकारे श्रीगुरुसेवेच्या द्वारा श्रीअभिनवगुप्त यांनी तंत्ररूपीवटवृक्षाचे बीज म्हणून आत्मशक्तीच्या अर्थात् कुंडलिनीशक्तीच्या जागृतीचा उल्लेख करून एक प्रकारे सर्व साधनमार्गाचेच सार कथन केले आहे. हा विषय अधिक स्पष्ट करताना

"**तांत्रिक वाङ्मयमें शाक्तदृष्टि**" या ग्रंथातील "**शक्ति-साधना**" या लेखात म. म. श्रीगोपीनाथ कविराज यांनी असे म्हटले आहे की, "जे विचारशील लोक आहेत व ज्यांचा साधनराज्यात प्रवेश झाला आहे ते लोक या भूतलावरील यच्चयावत् साधना ही फक्त शक्तीची आराधनाच आहे, हे जाणत असतात. कोणत्याही मनुष्याच्या किंवा साधकाच्या अंतर्दृष्टीपुढे कोणताही आदर्श ध्येयरूपाने निश्चित झालेला किंवा प्रतिष्ठित झालेला असला तरी जर तो साधक शक्तिसंचय करून आपली दुर्बलता दूर करू शकला नाही तर आपल्यापुढे ठेवलेल्या आदर्शाची प्राप्ती सम्यक्पणे करून ती आत्मस्वरूपात परिणत करण्यात तो समर्थ व बलशाली ठरणार नाही. या जगातील सर्व सिद्धी शक्तिसापेक्ष आहेत. याकरिता ज्या प्रकारच्या सिद्धीची साधकाला अपेक्षा असते त्या प्रकारची सिद्धी आत्मशक्तीच्या विकासाचा अभ्यास केल्याशिवाय प्राप्त होणे शक्य नाही.

एकदा या प्रकारे विचार केला की, शिव, विष्णू, गणेश, सूर्य अथवा अन्य कोणत्याही देवतेची उपासना केली तर ती मूलतः शक्तीचीच उपासना आहे, हे लक्षात येते. या रीतीने वैष्णवादि सर्व संप्रदायांच्या सर्व साधना या शक्तिसाधनेच्या अंतर्गतच येतात. याशिवाय प्रत्यक्षपणेही शक्तीची साधना करणे शक्य असते. आम्ही येथे साक्षात् शक्तिसाधनेसंबंधीच संक्षेपाने विवेचन करणार आहोत.

आपण इंद्रियांच्या द्वारा ज्या रूपरसादि पांचभौतिक स्थूल जगताचा अनुभव घेतो ते जगत् इंद्रिये उपरम किंवा शांत झाली किंवा त्यांचा पूर्ण प्रत्याहार झाला की, त्या रूपात शिल्लक राहत नाही. खरे पाहता एका दृष्टीने बाह्य जगत् हे इंद्रियांचाच एक प्रकारे फक्त बहिर्विलासच असतो. डोळ्यांमुळेच रूपाचा विकास होतो आणि डोळेच पुन्हा ते रूप पाहत असतात. समष्टिचक्षू हेच सर्व रूपे निर्माण करतात आणि व्यष्टिचक्षू त्या रूपाचा उपभोग घेतात. हीच गोष्ट इतर इंद्रियांच्या बाबतीत असते, हे लक्षात घेतले पाहिजे. यामुळे समष्टिभावापन्न पंचेंद्रियांपासून भौतिक जगताचा विकास होतो आणि व्यष्टिगत पंचेंद्रिये त्या जगताचा संभोग घेतात. साधक जर इंद्रियांचा प्रत्याहार करून त्यांना आपल्या मूळस्थानामध्ये लीन

करू शकला तर एकीकडे ज्याप्रमाणे बाह्य जगताचा लोप होतो त्याचप्रमाणे दुसरीकडे इंद्रिये लीन झाल्यामुळे त्यांची संभोगाची भावना किंवा प्रवृत्ती निवृत्त होते. जर साधकाच्या चित्तामध्ये किंवा अंतःकरणामध्ये प्रथमपासूनच ज्ञानाचा संचार झालेला असेल तर या अवस्थेत विशुद्ध अंतःकरण उत्पन्न होते आणि या बरोबरच अंतर्जगताचे स्फुरण होते. बाह्य जगताप्रमाणेच अंतर्जगतही समष्टिभूत अंतःकरणच निर्माण करते आणि व्यष्टिभूत अंतःकरणाला निरुद्ध अवस्था प्राप्त झाली की, अंतर्जगत नाहीसे होते. त्यावेळी अतिवाहिक अर्थात् सूक्ष्म जगताचा भोग करणारा कोणीही असत नाही. त्यानंतर जीव शुद्ध कारण-भूमीत स्थान प्राप्त करतो. त्यावेळी समष्टिकारण-बिंदूचे स्फुरणात्मक कारणजगत दिसू लागते आणि व्यष्टिकारणबिंदू तादात्म्यभावाने त्या दृश्याचे दर्शन घेतात. जर सौभाग्याने एखादा भाग्यवान् साधक-जीव या मूळग्रंथीचा भेद करू शकला तर तो मूळ अविद्येच्या विलासाचे स्वरूप असलेल्या या मिथ्या प्रपंच्याच्या पाशाच्या जाळ्यातून कायमचा सुटतो.

आत्तापर्यंत केलेल्या विवेचनावरून हे लक्षात येते की, स्थूल, सूक्ष्म व कारणरूप जगत ही सर्व त्या त्या शक्तीचा केवळ विकास आहेत. शक्तीच्या या तीन विभागांमध्ये अर्थात् आत्मा, देवता आणि भूतरूपामध्ये असलेल्या शक्तीच्या तीन प्रकारांच्या स्थितीचे अनुसरण करीत तिच्या परिणामांचे स्वरूप असलेले जगतही कारणादि विविध रूपांमध्ये प्रकट होते. शक्ती बहिर्मुख होऊन ज्यावेळी घनीभाव अर्थात् स्थूलतत्त्व प्राप्त करते त्यावेळी एकीकडे ज्याप्रमाणे भौतिक तत्त्वांचा आविर्भाव होतो त्याचप्रमाणे दुसरीकडे ती शक्ती क्रमाक्रमाने विरळ होत होत अंतःसंकोचाची अवस्था प्राप्त करून घेऊन "आत्मा" किंवा "बिंदू" या नावाने ओळखली जाते. त्यामुळे तथाकथित आत्मा, देवता आणि भूत या सर्व गोष्टी एकाच आद्याशक्तीच्या केवळ तीन अवस्था आहेत, यात काहीच शंका नाही. याप्रमाणेच कारण, लिंग व स्थूल (देह) हे त्रिविध जगतही एकाच मूळ सत्तेचे तीन प्रकार किंवा परिणाम आहेत. यांच्याशिवाय दुसरे काहीही नाही. शक्तीच्या बरोबर सत्तेचा काय संबंध आहे? याची चर्चा आम्ही

यावेळी येथे करणार नाही; परंतु हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, या दोहोंमधील विषमता किंवा भेदच जगाची निर्मिती आणि संभोग अर्थात् ईश्वरभाव व जीवभाव यांचा उन्मेष किंवा प्रकटीकरण करीत असतो; परंतु ज्यावेळी साम्यावस्थेचा उदय होतो त्यावेळी ज्याप्रमाणे एकीकडे जीव आणि ईश्वर यांच्यामधील परस्परांचा भेद नाहीसा होतो त्याप्रमाणे दुसरीकडे सृष्टी आणि दृष्टी यांचा व्यापारही एकरूप होऊन जातो. त्यावेळी साधकाच्या पात्रताभेदानुसार साम्यावस्थेची किंवा सामरस्याची प्राप्ती होत होत, त्रिविध भेदांच्या साम्यानंतर स्वाभाविक नियमानुसार परमाद्वैत किंवा महासाम्याचा आविर्भाव होतो. जी शक्ती आणि सत्ता स्थूलभूमीत आत्मप्रकाशाच्या रूपाने प्रकटित झालेली असते, त्यांचे साम्यच प्रथम साम्य आहे. त्याचप्रमाणे सूक्ष्म आणि कारण-जगताच्या संपर्कात राहणारी शक्ती आणि सत्ता यांचे साम्य क्रमशः दुसरे व तिसरे साम्य किंवा सामरस्य या नावाने ओळखले जाते. हे त्रिविध साम्य आपला परस्परातील भेद दूर करून ज्या महासाम्याने एकत्वाचा किंवा अद्वैताचा लाभ करते, त्यालाच परमाद्वैत किंवा ब्रह्मतत्त्व असे म्हणतात. महाशक्ती कुंडलिनी जागृत झाल्याशिवाय या अद्वैत-तत्त्वात स्थिती प्राप्त करणे ही फार दूरची गोष्टी आहे; मग त्यात प्रवेशाचा अधिकार प्राप्त करणे ही तर असंभवनीय गोष्ट ठरते. अवस्थेच्या भेदानुसार प्रत्येक स्तरामध्ये शक्तीच्या जागृतीची आवश्यकता असते, हे नितांत सत्य आहे. असे जर घडले नाही तर त्या त्या अवस्थेची सत्ता आपला अचेतन भाव सोडून देऊन स्वयंप्रकाश चैतन्याबरोबर एकीभूत होऊ शकत नाही; कारण की, शक्ती जागृत झाल्याशिवाय ती सत्तेचा प्रकाश करू शकत नाही आणि जी सत्ता अप्रकाशमान म्हणजे अचेतन असते ती कधीही चिद्‌भावाने युक्त म्हणजे चैतन्ययुक्त, ब्रह्मयुक्त किंवा शिवयुक्त होऊ शकत नाही. या स्थितीलाच असत्कल्प किंवा जडता असे दुसरे नाव आहे.

येथपर्यंत केलेल्या विश्लेषणावरून हे लक्षात येणे सहज शक्य आहे की, शक्तीच्या आराधनेशिवाय एकीकडे ज्याप्रमाणे स्थूलभावावर विजय मिळविणे किंवा तो स्वाधीन करणे शक्य होत नाही त्याचप्रमाणे दुसरीकडे

आत्मसत्तेची प्राप्ती करणे शक्य होत नाही. या पृथ्वीवर जितक्या प्रकारचे धर्मसंप्रदाय आहेत त्या सर्व संप्रदायामध्ये कळत किंवा न कळत आणि साक्षात्‌रूपाने किंवा पारंपरिक भावाने का होईना पण शक्तीच्या आराधनेशिवाय कोणाचेही काम चालू शकत नाही.

ज्या या अनंत वैचित्र्ययुक्त विश्वाचा आपण निरंतर नाना प्रकारे अनुभव घेत असतो ते सर्व विश्व खरे पाहता शक्तीच्या आत्मप्रकाशाव्यतिरिक्त आणखी काहीही असत नाही. अत्यंत सूक्ष्म असे कारण जगत्, लिंगात्मक सूक्ष्म जगत् आणि इंद्रियगोचर स्थूल जगत् ही सर्व शक्तीचीच भिन्नभिन्न विकासाची स्वरूपे आहेत. या विश्वाच्या मुळाशी जी पूर्ण सत्ता पारमार्थिक रूपाने राहत असते तेच शक्तीचे परमश्रेष्ठ स्वरूप आहे. या पूर्ण व परमश्रेष्ठ शक्तीच्या स्वरूपाला "विशुद्ध चैतन्य" असे नाव देऊन त्याचे वर्णन केले तरी त्याचा योग्य परिचय होऊ शकत नाही आणि "सच्चिदानंद" या शब्दाने जरी त्याचे वर्णन केले तरीही त्या स्वरूपाचा पूर्ण निर्देश झाला असे वाटत नाही. अशा प्रकारे वाणी आणि मनाच्या पलीकडे असलेली व जिचा निर्देश करता येत नाही अशी जी एक अवर्णनीय परमार्थसत्ता आहे तिलाच शास्त्रामध्ये "परमपद" असे म्हटले आहे. हे परमपद सत् आहे की असत् आहे, या विषयाचा लौकिक विचाराच्या दृष्टीने विचार करणे योग्य असले तरीही ज्यावेळी या विषयाची चर्चा करण्यास व सूक्ष्म विचार करण्यास सुरुवात होईल त्यावेळी परमपदात प्रकाश व विमर्श हे दोन्ही अंश स्वभावसिद्धरूपाने स्थित असतात, हे लक्षात येईल. प्रकाशाच्या शिवाय ज्याप्रमाणे विमर्श किंवा विचार असणे शक्य नाही त्याप्रमाणेच विमर्शाचा किंवा विचाराचा त्याग केला तर प्रकाशाची स्थिती असणे शक्य नाही. या शिव-शक्तिस्वरूप प्रकाश आणि विमर्श यांच्या नित्य संबंधाचीच चैतन्यरूपाने महापुरुषांना अनुभूती येते. या संबंधाचे व अनुभूतीचेच शास्त्रांमध्ये विस्ताराने वर्णन केलेले आहे. परंतु चैतन्य असले तरीही प्रकाश आणि विमर्शाच्या साम्यावस्थेत ते अव्यक्तच राहते. या अवस्थेचेच दुसरे नाव "परमपद" असे आहे, यात काहीच शंका नाही. या साम्यावस्थेत महाशक्तिस्वरूप अनादि शक्ती ही परमशिवाच्या बरोबर सामरस्यभावयुक्त

होऊन अद्वयरूपात विराजमान राहते. स्वरूपाच्या दृष्टीने या अवस्थेला एक प्रकारे "परब्रह्मभाव" असे दुसरे नाव देता येईल; परंतु या अवस्थेत स्वरूपभूत शक्ती स्वतंत्र व नित्य स्थित राहत असल्यामुळे ही अवस्था ब्रह्मतत्त्वाहूनही विलक्षण वेगळी असते. या महाशक्तिस्वरूप परमपदाची जी गोष्ट येथे कथन केली आहे, ती वाचल्यावर हाच निष्कल अथवा पूर्णकल परमेश्वर आहे असे भ्रमाने कोणीही समजता कामा नये; कारण की, निष्कल, निष्कल-सकल आणि सकल या विश्वाच्याच तीन अवस्था आहेत. परंतु महाशक्ती सर्वातीत असल्यामुळे विश्वातीत परमपदापासून तिच्या स्वातंत्र्यस्वरूप आत्मविलासामुळे नित्य साम्य कोणत्याही प्रकारे भग्न न होता, एक प्रकारे भग्नवत् अवस्था उत्पन्न होते आणि या वैषम्याचे फळ म्हणून गुणप्रधान भावात छत्तीस तत्त्वांनी युक्त असलेले विश्व निर्माण होते. अखंड परमार्थस्वरूप शिवशक्तियुक्त एकरूप, अभिन्न व एकरस असले; तरी स्वातंत्र्यजनित विक्षोभामुळे तिच्या द्वारा किंवा तिच्यातच भेदमय विश्वप्रपंचाचा उदय होतो. यावरून हे स्पष्ट होते की, त्रिविध विभागांनी युक्त असलेले सर्व विश्व मूळ शक्तीचा फक्त विकास आहे, हे निश्चित सत्य आहे.

ज्यावेळी ती पराशक्ती आत्मगर्भस्थ म्हणजे आपल्या बरोबर एकीभूत असलेले विश्व अर्थात् प्रकाश पाहण्यास उन्मुख होते त्यावेळी मंत्रामुळे मर्यादित झालेली शक्ती आणि शिव साम्यभावापन्न म्हणजे समरस होऊन एका बिंदुरूपात परिणत होतात. हा बिंदूच तांत्रिक-परिभाषेत **"कामरूपपीठ"** या नावाने प्रसिद्ध आहे. या पीठामध्ये अभिव्यक्त होणारे चैतन्य स्वयंभूलिंग या नावाने ओळखले जाते. हे शक्तिपीठ शक्तिअंशाची एकमात्रा व शिवांशाची एकमात्रा या प्रमाणात एकरूप अर्थात् समभावयुक्त होऊन संघटित होते. शक्ती आणि शिवाच्या या अंशद्वयाला शांतशक्ती आणि अंबिकाशक्ती अशी नावे आचार्यांनी दिलेली आहेत. या पीठामध्ये महाशक्तीचा जो आत्मप्रकाश असतो तो परावाक्रूपाने प्रसिद्ध आहे. ज्या साधकांनी तंत्राला मान्य असलेल्या योगसाधनेचा यथायोग्य रीतीने अभ्यास केला आहे, त्यांना हे माहीत आहे की, येथूनच शब्दराज्याची सुरुवात होते. हेच

प्रणवाचे परमश्रेष्ठरूप किंवा वेदाचे स्वरूप आहे. यानंतर शक्तीचा क्रमिक विकास होत होत ती शांताशक्ती "इच्छा" रूप शक्तीत परिणत होते आणि शिवांश अंबिकाशक्तीही "वामा" रूपात प्रकट होते. या दोन्ही शक्तींचा परस्परांमधील वैषम्याचा परिहार झाल्यावर, ज्या अद्वय सामरस्यमय बिंदूचा आविर्भाव होतो, त्यापासून त्याला अनुकूल अशा चैतन्याचे स्फुरण होते. या बिंदूला "पूर्णगिरिपीठ" आणि या चिद्विकासाला "बाणलिंग" ही नावे आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे. शास्त्रीय दृष्टीने ही "पश्यंतीवाक्" ची अवस्था आहे. पराशक्ती शब्दाच्या प्रथमभूमीमध्ये किंवा कामरूपपीठामध्ये आत्मगर्भस्थ विश्वाला नित्य वर्तमानरूपात पाहते. या अवस्थेत अतीत आणि अनागतरूप खंडकालाची सत्ता असत नाही आणि दूर व जवळ यांचे व्यवधानही राहत नाही. कार्य आणि कारण यांचा कठोर नियम येथे लागू होत नाही. या नित्य मंडलात कोणत्याही प्रकारचे आवरण असत नाही आणि विक्षेप किंवा चंचलता असत नाही. हीच शांतिमय अवस्था आहे. यानंतर इच्छाशक्तीच्या उन्मेषाबरोबर शब्दाच्या द्वितीय स्तरात सृष्टीचा विकास होतो. त्याला "नित्यमंडल" असे म्हणतात. ते शक्तिगर्भस्थ बीजभूत विश्व आहे. इच्छेच्या प्रभावाने ज्यावेळी तिच्या गर्भातून एका प्रकाराने निर्मिती होते त्यावेळी त्याला सृष्टी असे नाव प्राप्त होते. या भूमीपासूनच कालाचा प्रारंभ होत असल्यामुळे ही सृष्टिक्रिया एकदम घडून न येता क्रमानुसार होते. या प्रकारानेच देश आणि कार्यकारणभावाचे स्फुरणही येथूनच होते, हे लक्षात घेतले पाहिजे. या परावस्थेमध्ये इच्छाशक्तीचा उपरम झाल्यावर ज्ञानशक्तीचा उदय होतो. त्याचप्रमाणे तो शिवांश ज्येष्ठाशक्तीबरोबर अद्वैतभावाने एकरूप होऊन "**जालंधरपीठ**" रूपी सामरस्यबिंदूची सृष्टी करतो. या बिंदूपासून अभिव्यक्त होणारे चैतन्य इतरलिंग या नावाने प्रसिद्ध आहे. शक्तीच्या या स्तरामध्ये "मध्यमावाक्" आविर्भूत होते आणि याच्या प्रभावाने निर्माण झालेले जगत् त्या त्या भावात स्थिर होते. ज्यावेळी स्थितिशक्ती क्षीण होते त्यावेळी स्वभावाच्या नियमानुसार अंतर्मुख आकर्षण प्रबल झाल्यामुळे संहारशक्तीच्या क्रियेला प्रारंभ होतो. त्यावेळी ज्ञानशक्ती क्रियाशक्तीच्या रूपात परिणत होऊन

शिवांश असलेल्या रौद्रिशक्तीबरोबर साम्यभाव प्राप्त करते. यालाच "**उड्डीयान-पीठ**" असे म्हणतात. या बिंदूबरोबर चित्शक्ती महातेजाने संपन्न होऊन परलिंगरूपात अभिव्यक्त होते. ही शब्दाची "**वैखरी**" नावाची चवथी भूमी आहे. आपण ज्या संहारशील क्षयधर्मयुक्त म्हणजे नाश पावणाऱ्या जगताचा अनुभव घेतो ते जगत् या वैखरी शब्दाचीच विभूती आहे.

पश्यंती, मध्यमा आणि वैखरी या शब्दांच्या ज्या तीन अवस्थांविषयी यापूर्वी वर्णन केले त्या अवस्था म्हणजे प्रणवाचेच "अ" कार, "उ" कार आणि "म" कार होत अथवा त्या अवस्था ज्ञानी मनुष्याच्या दृष्टीने ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद या तीन वेदांच्या रूपाने प्रकाशित होत असतात. त्रिलोक, त्रिदेवता, त्रिकाल इत्यादि गोष्टी अखंड परावाक् अर्थात् तुरीयवाक्याच्याच त्रिविध परिणामरूपी अवस्था आहेत. बिंदुगर्भित असा जो महात्रिकोण आहे आणि जो विश्वब्रह्मांडाच्या मूलरूपाने शास्त्रांमध्ये सर्वत्र प्रसिद्ध आहे; तो याच चतुर्विध शब्दांच्या संबंधाने प्रकट होतो. या त्रिकोणाच्या तीन रेषा या पश्यंती, मध्यमा आणि वैखरीरूप तीन प्रकारचे शब्द; सृष्टी, स्थिती आणि संहार हे तीन प्रकारचे व्यापार; वामा, ज्येष्ठा आणि रौद्री या तीन प्रकारच्या क्रिया; ब्रह्मा, विष्णू आणि रुद्र हे तीन प्रकारचे शिवांश; अथवा इच्छा, ज्ञान आणि क्रियारूप तीन प्रकारचे शक्त्यंश अर्थात् शक्तीचे अंश यांच्या प्रतिनिधी आहेत. त्रिकोणाचा मध्यबिंदू म्हणजे परावाक् अथवा अंबिका आणि शांता या दोन शिव-शक्ती अंशाच्या सामरस्याचे अर्थात् एकरूपतेचे प्रतीक आहे. जरी बिंदूमध्ये शिव आणि शक्ती या दोघांचाही अंश असला आणि त्रिकोणातही तो शिव-शक्ती-अंशात्मक बिंदूच असला तरीसुद्धा बिंदू प्रामुख्याने शिवरूपातच परिणत म्हणजे परिवर्तित होत असतो. या बिंदु-समन्वित-त्रिकोण-मंडलाद्वारा संपूर्ण बाह्यजगाचा आविर्भाव अर्थात् उत्पत्ती होत असते.

आद्याशक्ती तत्त्वातीत अर्थात् तत्त्वाच्या पलीकडील असूनसुद्धा सर्वतत्त्वमयी आणि प्रपंचरूपा आहे. ती नित्य परमानंद-स्वरूपिणी असून या चराचर जगाचे बीजस्वरूप आहे. ती प्रकाशात्मक-शिवाच्या स्वरूपाचे उद्बोधन करणारा अर्थात् ज्ञान करून देणारा आरसाच आहे. "अहम्"

चे ज्ञानच शिवस्वरूप आहे. आद्याशक्तीचा आश्रय घेतल्याशिवाय आत्मज्ञान प्रगट होत नाही. तंत्रशास्त्राचे विद्वान् असे म्हणतात की, ज्याप्रमाणे एखादी व्यक्ती आपल्यासमोर असलेल्या निर्मल आरशात आपल्या प्रतिबिंबाला पाहून त्या प्रतिबिंबाला "अहं" च्या रूपात ओळखते त्याप्रमाणे परमेश्वर आपल्या आधीन असलेल्या शक्तीला पाहूनच अर्थात् शक्तिद्वाराच स्वस्वरूपाची उपलब्धी अर्थात् जाणीव करून घेत असतो. आत्मशक्तीचे दर्शन तसेच आत्मस्वरूपाचे ज्ञान आणि आस्वादन अर्थात् आत्मानुभव हे सर्व एकच वस्तुस्वरूप आहेत. हाच पूर्णाहंतेचा चमत्कार किंवा सच्चिदानंदाची घनीभूत अभिव्यक्ती आहे. "मी पूर्ण आहे" हे ज्ञानच नित्य-सिद्ध-आत्मज्ञानाचे प्रकृत स्वरूप आहे. ज्याप्रमाणे वस्तूचा निकट संबंध नसेल तर आरसा प्रतिबिंबाचे ग्रहण करू शकत नाही किंवा वस्तू जरी जवळ असली तरी प्रकाशाच्या अभावामुळे आरशातील प्रतिबिंब हे प्रतिबिंबरूपात दिसत नाही त्याचप्रमाणे ही पराशक्तीदेखील प्रकाश-स्वरूप परमशिवाच्या सान्निध्याशिवाय आपल्या अंतःस्थित अर्थात् अंतरंगात असलेल्या विश्वप्रपंचाला प्रकट करण्यास समर्थ ठरत नाही. याच कारणामुळे शुद्धशिव अथवा शुद्धशक्ती परस्पर संबंधरहित होऊन एकेकटे जगाच्या निर्माणाचे कार्य करू शकत नाहीत. दोघांच्या सापेक्ष सहकार्याशिवाय सृष्टिकार्य निर्माण होणे असंभव आहे. सर्व तत्त्वे या दोघांच्या परस्पर संबंधानेच उद्भूत होतात. यामुळे शिव आणि शक्ती किंवा प्रकाश आणि विमर्श हे परस्पर भिन्न आणि स्वतंत्र पदार्थ आहेत असे कोणीही मानू नये.

शिवशक्तिरिती ह्येकं तत्त्वमाहुर्मनीषिणः।

शिव आणि शक्ती हे एकच तत्त्व आहे असे विचारवंताचे मत आहे. हाच शास्त्राचा अंतिम सिद्धांत आहे. तरीसुद्धा संहार-कार्यामध्ये शिवाचे आणि सृष्टिकार्यामध्ये शक्तीचे प्राधान्य म्हणजे प्रमुखत्व स्वीकारावेच लागेल. पराशक्ती ही स्वतंत्र असल्यामुळे परावाक् प्रभृती क्रमाचा अवलंब किंवा स्वीकार करून विश्व निर्माणाचे कार्य करते आणि त्यानंतर उत्पन्न झालेल्या विश्वाच्या केंद्रस्थानी राहून त्याचे अर्थात् विश्वाचे नियमन करते. हे स्वातंत्र्यच वर सांगितलेल्या पद्धतीने क्रमशः इच्छा, ज्ञान आणि क्रिया

यांचे स्वरूप धारण करून वैचित्र्याची म्हणजे विविधतेची निर्मिती करते आणि विश्वरूप धारण करते. शिव तटस्थ आणि उदासीन राहून निरपेक्ष अशा साक्षिरूपाने आत्मशक्तीची ही लीला पाहत असतात. ही विविध तत्त्वांनी युक्त असलेली विश्वसृष्टी म्हणजेच पराशक्तीचे स्फुरण आहे. त्यामुळे शक्तीची अशी एक अव्यक्त किंवा प्रलीन अवस्था असते की, ज्या अवस्थेमध्ये शक्ती शिवाच्या रूपात एकाकार अर्थात् एकरूप होऊन शिवरूपातच विराजमान होऊन राहते. तसेच तिची एक अभिव्यक्त किंवा प्रकट अवस्था आहे की, ज्या अवस्थेमुळे तिच्यामध्ये आणि तिच्याद्वारा हे तत्त्वमय विश्व अथवा देवताचक्र एकाच वेळी तसेच क्रमशः आविर्भूत अथवा निर्माण होते. पराशक्तीच्या द्वारा होणारे तिचे स्फुरणरूप दर्शन आणि विश्वाचे सृजन अथवा निर्मिती हे दोन्हीही एकच आहे; कारण या आदिम भूमीमध्ये दृष्टी आणि सृष्टी हे शब्द समानार्थक आहेत. परंतु या क्रमिक आविर्भावाची एक प्रणाली आहे.

सृष्टीच्या प्रारंभिक अनादिकालापासून जी अव्यक्त, पूर्ण, निराकार आणि शून्य-स्वरूप अशी वस्तू अर्थात् तत्त्व अस्तित्वात आहे ती वस्तू तत्त्वातीत, प्रपंचातीत तसेच व्यवहारातीत म्हणजे व्यवहाराच्याही पलीकडे आहे. तीच (वस्तू) शाक्तांची महाशक्ती आणि शैवांचा परमशिव आहे. वाणी अर्थात् शब्द आणि मन यांना (ही वस्तू) अगोचर असल्यामुळेच हिला "अनुत्तर" असे म्हणतात. वास्तविक पाहता हिचे वर्णन कोणीही पूर्वी करू शकलेला नाही आणि भविष्यात कोणीही करू शकेल अशी शक्यता नाही. हिला विशुद्ध प्रकाश म्हणावे तर अंतर्लीन विमर्शामुळे ही अप्रकाशित आहे. यामुळे या वस्तूमध्ये स्वयंप्रकाशित्व आहे असे म्हणता येत नाही. याचप्रमाणे याला विशुद्ध-विमर्शदेखील म्हणता येत नाही; कारण प्रकाशहीन विमर्श हा असत्कल्प आहे. या तत्त्वातीत आणि अनुत्तर-अवस्थेसाठी शास्त्रामध्ये वाचकरूपाने आदि अर्थात् प्रथमवर्ण "अ" काराचा प्रयोग होतो. यानंतर दोघांची सामरस्य अवस्था म्हणजे "अ" काररूप प्रकाशाच्याबरोबर "ह" काररूप विमर्शाचे साम्य म्हणजेच अग्नीच्याबरोबर सोमाचा साम्यभावच "काम" अथवा "रवि" या नावाने

प्रसिद्ध आहे. शास्त्रामध्ये ज्या अग्निषोमात्मक बिंदूचा उल्लेख सापडतो त्या बिंदूचे स्वरूप हेच आहे. शिव म्हणजेच "अ" आणि शक्ती म्हणजेच "ह" असून बिंदुरूपामध्ये हेच स्वरूप "अहं" किंवा "पूर्णाहंता" होय. साम्य भंग पावल्यानंतर हाच बिंदू प्रस्पंदित अर्थात् स्फुरण पावून शुक्ल आणि रक्त बिंदूत प्रगट होतो. त्या स्फुरण कार्यामुळे जे (तत्त्व) प्रगट होते, त्याचेच वर्णन शास्त्रात "संवित्" अथवा "चैतन्य" या नावाने केले जाते. याचे दुसरे नाव चित्कला असे आहे. अग्नीच्या संपर्कामुळे ज्याप्रमाणे तूप वितळून धारेच्या रूपात वाहू लागते त्याप्रमाणे प्रकाशात्मक शिवाच्या संपर्कामुळे विमर्शरूपा पराशक्ती गतिमान होते आणि तिच्या परमानंदमय अमृतधारेचा स्राव अर्थात् प्रवाह सुरू होतो. हीच धारा वर सांगितल्याप्रमाणे एक प्रकारे चित्कला आणि दुसऱ्या प्रकारे ब्रह्मानंदाचे स्वरूप आहे. निष्कल अर्थात् कलारहित चैतन्यावर कलेचा आरोप करणे असंभवनीय आहे. म्हणून ही चित्कला महाशक्तीच्या स्वातंत्र्याच्या उन्मेषामुळे म्हणजे स्फुरणामुळे (होणाऱ्या) शिवशक्तीच्या अपेक्षित वैषम्यामुळे उत्पन्न झालेल्या शक्तिभावाच्या प्राधान्याने प्रकाश आणि विमर्शाच्या अंशाच्या म्हणजे प्रकट झालेल्या शक्तीच्या अंशाच्या घनीभूत एकत्रीकरणाने उत्पन्न होते. शुद्ध प्रकाश किंवा शुद्ध विमर्श "बिंदू" पदाचा वाच्य नाही. आणि ज्या विमर्शरूप शक्तीमध्ये संपूर्ण प्रपंच विलीन राहतो, तिच्या संसर्गामुळे अनुत्तर म्हणजे श्रेष्ठ प्रकाश बिंदुरूप धारण करतो. हा संसर्ग म्हणजे विमर्शरूप शक्तीमध्ये प्रकाशाचे अनुप्रवेशन म्हणजे अंतर्भूत होणे होय. या बिंदूचेच दुसरे नाव प्रकाशबिंदू आहे. तो (प्रकाशबिंदू) विमर्शशक्तीच्या गर्भात स्थित असतो. यानंतर विमर्शशक्तीच्या प्रकाशबिंदूमध्ये प्रविष्ट होऊन हा बिंदू उच्छून म्हणजे पुष्ट होतो. त्यावेळी त्याच्यामध्ये तेजोमय बीजस्वरूप नाद उत्पन्न होतो. या नादामध्ये सर्व तत्त्वे सूक्ष्मरूपाने अंतर्भूत असतात. नाद उत्पन्न झाल्यानंतर तो त्रिकोणाकाररूप धारण करतो. हेच "अहम्" नावाच्या बिंदू आणि नादमय अशा प्रकाश विमर्शाचे म्हणजे शिवशक्तीचे शरीर आहे. यामध्ये प्रकाश हा शुक्ल-बिंदू आहे आणि विमर्श हा रक्त-बिंदू आहे, तसेच दोघांचे परस्पर प्रवेशात्मक साम्य हा मिश्र-बिंदू आहे. याच

साम्याचे दुसरे नाव “परमात्मा” असे आहे. यालाच “रवि” अथवा “काम” असे म्हटले जाते, हे वर सांगितलेच आहे. अग्नी आणि सोम याच “कामा” चे कलाविशेष आहेत. त्यामुळे कामकला म्हटल्यानंतर तीनही बिंदूंचा बोध होतो. या तीन बिंदूंचा एकत्रित असा महात्रिकोणच दिव्याक्षर-स्वरूप आद्या-शक्तीचे स्व-रूप आहे. हिच्या मध्यातच रवि-बिंदू देवीच्या मुखरूपाने, अग्नी आणि सोम बिंदू दोन स्तनांच्या रूपाने, तसेच “ह” काराची अर्द्धकला म्हणजेच हार्द्धकला योनि-रूपाने मानली जाते. ही अर्द्धकलाच अतिशय रहस्यमय, गूढ असे तत्त्व आहे. याचे विशेष विवेचन या निबंधामध्ये देणे शक्य नाही, तरीसुद्धा आता जिज्ञासू साधकांच्या तृप्तीसाठी एवढेच सांगता येईल की, शिवशक्तीच्या मिलनामुळे उत्पन्न झालेली अमृतधारा प्रवाहित झाल्यानंतर तिच्यामुळे ज्या लीलारूप तरंगाची निर्मिती होते, त्या तरंगालाच तांत्रिक परिभाषेत “अर्द्धकला” या नावानेच ओळखले जाते. वर ज्या त्रिकोणाच्या विषयी सांगितले आहे, तो त्रिकोण म्हणजे पश्यंती, मध्यमा आणि वैखरी या तीन शब्दांचे परस्परमिश्रित असे एकत्रित स्वरूप आहे. याच्या केंद्रस्थानी असलेला बिंदू, ज्याचे स्वरूप “अहंरूपाने” वर्णिले आहे, तो बिंदू श्रेष्ठ मातृकेचे विलासक्षेत्र म्हणजे सदाशिव तत्वाचे स्वरूप आहे. या मध्यबिंदू तसेच मूल-त्रिलोकाद्वारा संपूर्ण तत्त्वांची आणि पदार्थांची निर्मिती होते. कोणत्याही देवतेचे कोणत्याही स्थरावरील मूळतत्त्वावर अनुसंधान केले असता त्या अनुसंधानाच्या अंतिम-अवस्थेमध्ये हा लिंग-योनीचे समन्वयरूप असलेला त्रिकोणमध्यस्थ म्हणजे केंद्रभागी असलेला बिंदू किंवा बिंदुगर्भित त्रिकोण दिसून येतो. याच कारणामुळे तंत्रशास्त्रात ज्या कोणत्याही देवतेच्या चक्राचे वर्णन आले आहे, तेथे सर्वत्रच हा बिंदू आणि त्रिकोण मूल-स्थानामध्ये साधारण स्वरूपाने विद्यमान म्हणजे स्थित आहे. चतुरस्त्र इत्यादि पीठांचे वर्णन असले तरी सुद्धा सूक्ष्म अशा अंतर्दृष्टीने पाहिल्यानंतर त्यांच्या मूल-स्थानीसुद्धा त्रिकोणाचेच अस्तित्व अवस्थित किंवा स्थित असल्याचे दिसून येते. त्रिकोणाच्या निरनिराळ्या प्रकारच्या स्पंदनामुळे अर्थात् स्फुरणामुळे वासनेचे वैविध्य आणि त्याला अनुसरून चक्राच्या निरनिराळ्या अवस्था

निर्माण होतात. प्रस्तुत निबंधामध्ये त्याची चर्चा करणे प्रासंगिक ठरणार नाही.

महाबिंदू हा अनंत कलेचा समष्टिरूप असला तरीही निरनिराळ्या ब्रह्मांडांना अभिव्यक्त करणाऱ्या घटक द्रव्यांच्या मात्रांच्या प्रमाणानुसार निर्दिष्ट अशा संख्येच्या कलेच्या द्वारा एकत्रित होऊन अव्यक्त गर्भापासून अहंच्या रूपात प्रकट होतो. हे दर्शन शास्त्रातील एक अत्यंत गंभीरतम असे रहस्य आहे. वेदान्तादि सर्व शास्त्रे निष्कल अव्यक्त सत्ता कोणत्या प्रकारे आपल्याला "अहम्" रूपामध्ये आत्म-प्रकाशित करते हे सांगतांना ते अनादि सिद्ध आहे, असेच गृहित धरून त्याचा स्वीकार करतात. परंतु या "अहम्" ची उत्पत्तिप्रणाली आणि संहारप्रणालीची योगसंपत्तीने व तांत्रिक दृष्टीने संपन्न असलेल्या साधकाशिवाय अन्य कोणत्याही साधकाला प्रत्यक्षपणे अनभूती येत नाही. व्यष्टी, समष्टी आणि महासमष्टी या सर्वांमध्ये एकच प्रणालीची क्रिया दिसून येते. कलेच्या निरंतर व क्रमिक पूर्णतेमुळे एकीकडे ज्याप्रकारे बिंदुरूप पूर्णकलेचा किंवा अहंतत्त्वाचा विकास होतो त्याप्रकारेच त्या कलेच्या निरंतर आणि क्रमिक क्षयामुळे क्रमाक्रमाने शून्यस्वरूप अहंभाववर्जित आत्मभावाचा आविर्भाव किंवा प्रकटीकरण होते. या दोन्ही अवस्थांमध्ये पूर्णकलेची एक कला नित्य साक्षिरूपाने प्रपंचाचा लय झाल्यानंतरही जागृत असते. ही एकच कला निर्वाणकलेच्या रूपाने जीवाच्या उन्मनी अवस्थेमध्ये राहते. ही कलाही निवृत्त झाल्यावर ज्या निष्कल अवस्थेचा विकास होतो तेच शिवशक्तितत्त्व आहे व तोच महाबिंदू आहे. त्यामुळे हे शिवत्व सदाशिवाचे दुसरे नाव आहे. ब्रह्मांडाची चरमावस्था ज्याप्रमाणे अस्मितेमध्ये म्हणजे "अहं" मध्ये परिणत होते आणि जी अस्मिता प्रकृतीचे व पुरुषाचे अवलंबन करून आत्मलाभ करून घेते त्याप्रमाणेच समस्त विश्वाच्या पर्यवसनात या विराट अस्मितारूप अर्थात् बिंदुस्वरूप सदाशिवतत्त्वाचा आविर्भाव होतो आणि या सदाशिवतत्त्वातच अधिष्ठित होऊन शिवशक्तिरूप मूळवस्तू लीलामय भावात आत्मप्रकाश करीत असते. यामुळे बिंदुरूप अहंकाराचे आत्मसमर्पण झाल्याशिवाय महाबिंदूचे किंवा पूर्णाहंतेचे स्वरूप उपलब्ध किंवा प्राप्त

होणे शक्य होत नाही. या प्राप्तीमध्ये पंचदशकलात्मक संसारी जीव आणि षोडश अथवा निर्वाण कलात्मक मुक्त जीव यांपैकी कोणाचीही सत्ता किंवा अस्तित्व शिल्लक राहत नाही. ही स्थिती म्हणजे जीवभावापासून निःशेषपणे मुक्त असलेला शिवभाव आहे, हे प्रथमच सांगितले आहे. जोपर्यंत सर्व पाशांच्या जाळ्यातून किंवा बंधनातून मुक्त होऊन जीव शिवरूपाने प्रकाशित होत नाही तोपर्यंत पूर्णस्वरूप अशा महाशक्तीशी यथार्थ किंवा स्पष्ट संबंध प्रस्थापित होत नाही किंवा तिचे ज्ञान होत नाही. शिवभाव प्राप्त झाल्यावरही शिवरूपात परिणत होण्यासाठी जर शवासनाचा स्वीकार करणे शक्य झाले नाही तर साधकाला आपल्यामध्ये महाशक्तीचा उन्मेष प्राप्त होत नाही.

ज्या स्थूल जगताचा आपल्याला नेहमी अनुभव येतो ते जगत् दीपकलिकेपासून निघणाऱ्या व प्रसार पावणाऱ्या प्रभामंडलाप्रमाणे एका बिंदूचा बाह्य प्रसार अथवा केवळ प्रकाशाचे विखरणे आहे. जर साधक प्रत्याहार करून या बिंदूचे प्रकाशकिरण गुंडाळून परत घेऊ शकला तर बाह्य जगत् स्वाभाविकपणेच बाह्य बिंदूत विलीन होते. या प्रकारानेच आतील लिंगात्मक जगत्ही विक्षुब्ध झालेल्या अंतःकरणाचा केवळ बाह्य विलास आहे आणि हे जगतही विलीन झाल्यावर ते त्याला अनुरूप अशा बिंदुस्वरूपात परिणत होते. या रीतीनेच कारण-जगताचाही उपसंहार होऊन ते कारणबिंदूत पर्यवसित होते. ही तिन्ही जगते जाग्रत, स्वप्न आणि सुषुप्ती अवस्थांची द्योतक आहेत. त्यामुळेच स्थूल, सूक्ष्म आणि कारण हे तीन बिंदूच त्रिकोणाच्या तीन भागांचे तीन बिंदू असतात. यांनाच सांकेतिक भाषेत "अकार" "उकार" व "मकार" या नावांनी संबोधिले जाते. ज्यावेळी साधकाच्या ठिकाणी अंतर्मुख होण्याची प्रेरणा उत्पन्न होईल त्यावेळी हे तिन्ही बिंदू त्रिकोणाच्या तिन्ही रेखांच्या आत प्रवाहित होऊन एका महाबिंदुरूपात पर्यवसित होतात. असे घडले की, हा महाबिंदूच तुरीय बिंदूच्या रूपात किंवा महाकारणरूपात परिणत झालेला आहे असे संबोधण्यास योग्य होतो. हाच त्रिकोणाच्या आत राहणारा मध्यबिंदू आहे. या संबंधी प्रथमच वर्णन केलेले आहे. या मध्यबिंदूतच

अनादि कालापासून शिवशक्तीचे अथवा परमपुरुष व पराप्रकृतीचे दिव्य-मिथुन विद्यमान राहत असून तेथेच त्यांच्या श्रृंगारादि अनंत भावांचा विलास अखंड होत असतो. हा विलास आदिबुद्ध आणि प्रज्ञापारमितेच्या युगनद्धस्वरूपाच्या अर्थात् जोडीच्या स्वरूपाच्या आत राधाकृष्णाच्या युगलाच्या किंवा जोडीच्या मिलनानेच निर्देशन करीत असतो. हा त्रिकोणच प्रणवाचे स्वरूप आहे. या ॐकारालाच साडेतीन वेढ्यांनी युक्त असलेली व सर्पाच्या आकाराची झोपलेली कुंडलिनी असे दुसरे नाव आहे. ज्यावेळी या कुंडलिनी शक्तीचा प्रबुद्ध अर्थात् जागृतभाव सम्यक्‌रूपाने सिद्ध होतो त्यावेळी शिव-शक्तीचा भेद मावळून जातो आणि त्याबरोबरच जीवाच्याबरोबर असलेला शिवाचा किंवा शक्तीचा वेगळेपणा गळून पडतो अगर नाहीसा होतो. त्यावेळी चक्र किंवा यंत्र हे अव्यक्तगर्भात विलीन होते. बिंदू आणि त्रिकोण यांचा भेद दूर झाला की, बिंदूचे बिंदुत्व आणि त्रिकोणाचे त्रिकोणत्व हे काहीही शिल्लक राहत नाही. त्यामुळे जे काही शिल्लक राहते त्याचा कोणत्याही नामरूपाने निर्देश करता येत नाही. हे सर्व तत्त्वांचे मूलकारण असले तरीही त्याला कोणत्याही विशिष्ट तत्त्वाच्या रूपात पाहणे किंवा संबोधणे योग्य होणार नाही. हे जे अवशिष्ट असते ते चित्, अचित् आणि ईश्वराचे अनादिभूत असे आदिकारण असले तरीही चित्, अचित् किंवा ईश्वर या कोणत्याही नावाने त्याचे वर्णन करता येणे शक्य नाही.

शक्तिसाधनेचे मूलसूत्र नादानुसंधान किंवा शब्दाचे क्रमिक उच्चारण हे आहे. ज्यावेळी बिंदू किंवा कुंडलिनी शक्ती विक्षुब्ध म्हणजे जागृत होते त्यावेळी ती नादाचा विकास करते. पूर्ण परमेश्वराच्या स्वातंत्र्य शक्तीमुळेच बिंदूच्या विक्षोभाचे म्हणजे कुंडलिनी शक्तीच्या जागृतीचे कार्य घडून येत असते. याचेच दुसरे नाव श्रीगुरुकृपा किंवा श्रीपरमेश्वराचा अनुग्रह असे आहे. या चिदाकाशस्वरूप बिंदूला खालच्या पातळीवर असलेली दुसरी कोणतीही शक्ती विक्षुब्ध अर्थात् जागृत करू शकत नाही. ज्यावेळी कुंडलिनी शक्ती मूलाधाराच्या खाली ऊर्ध्वमुख सहस्रार अथवा अकुलकमलात विराजमान राहते त्यावेळी ती अव्यक्त या नावाने विश्वोत्तीर्ण या अवस्थेमध्ये राहत असते. परंतु स्वातंत्र्य शक्तीमुळे ज्यावेळी ही शक्ती उत्थित होते

त्यावेळी तिच्या अभिव्यक्तीची जाणीव मूलाधारातच होते. येथूनच निराधार व निरालंब अशा सत्तेच्या आधारभावाची सूचना प्राप्त होते. त्यानंतर ही कुंडलिनी शक्ती जसजशी अधिकाधिक उद्‌बोधित, जागृत किंवा विकसित होत जाईल त्या त्या प्रमाणात आधारभाव कमी कमी होत जातो आणि शेवटी ती सर्व प्रकारे नाहीशी होऊन मस्तकातील ऊर्ध्व भागात असलेल्या सहस्रदल कमलात पुन्हा आपल्या मूळ शिवस्वरूपाने अकुल सागरात निमग्न होऊन जाते. अकुलापासूनच शक्तीचे उद्‌बोधन किंवा जागृती आणि अकुलातच तिचा लय होतो. कुंडलिनी शक्ती जागृत झाल्यावर मध्ये जो क्रियादि व्यापार घडतो अर्थात् साधन होते ते चैतन्यसंपत्तीच्या प्राप्तीकरताच असते. जो जीव अनंत गर्भात अचेतनभावाने अनादिकालापासून निद्रावस्थेमध्ये असतो तो श्रीगुरूंनी कृपा केल्यावर पूर्णरूपाने प्रबुद्ध होऊन चैतन्यस्वरूपाचे अवलंबन करून पुन्हा त्या अनंत गर्भात प्रविष्ट होतो. हा जो एका अकुलापासून दुसऱ्या अकुलापर्यंतचा मार्ग आहे तेच विश्वजगताचे मूलभूत चक्र आहे. ज्यावेळी मनुष्य गोलाकार मार्गावरून चालू लागतो आणि निरंतर सरळपणे पुढे पुढे जात राहतो त्यावेळी तो पुन्हा आपल्या मूळ स्थानावर परत येतो. मधले आवरण चक्रस्वरूपाचे असते. या प्रकारची चक्रे किती असतात याचा संख्येच्या द्वारा निर्णय होऊ शकत नाही. असे असले तरी साधक लोकांनी आपापल्या हेतूप्रमाणे आणि उद्देशानुसार त्यांना नावे दिली आहेत, मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध, लंबिकाग्र आणि आज्ञा ही या चक्रांची नावे असून ही सर्व चक्रे अज्ञान राज्यामध्येच येतात. जरी खालील चक्रापेक्षा त्याच्या वरील चक्रामध्ये शक्तीची सूक्ष्मता आणि निर्मलपणाचा विकास अधिक असतो हे खरे असले तरी ही सर्व चक्रे अज्ञानांतर्गत आहेत यात काहीच संदेह नाही. ज्यावेळी ज्ञानाचा संचार होतो त्यावेळी त्याच्या बरोबरच आज्ञाचक्राचा भेद होतो किंवा दुसऱ्या प्रकारे असे म्हणता येईल की, आज्ञाचक्राचा भेद झाल्यावर ज्ञानाचा उदय होतो. आज्ञाचक्राच्यावर किंवा नंतर बिंदूचे स्थान आहे. या बिंदूलाच योग्यांचा तिसरा नेत्र किंवा ज्ञानचक्षू असे म्हणतात. या बिंदूमुळेच ज्ञानभूमीची सूचना मिळते. चित्त एकाग्र करून ते पूर्णपणे

नष्ट केल्याशिवाय अर्थात् विक्षिप्त अवस्थेमध्ये बिंदू प्रकट होत नाही. हा बिंदू प्रकट झाला किंवा बिंदू अवस्थेत स्थिती प्राप्त झाली तरी यथार्थ लक्ष्याच्या अर्थात् इष्ट ध्येयाच्या प्राप्तीमध्ये अनेक अडथळे येत राहतात. जरी बिंदूच्या भूमीत साधक अहंभावात प्रतिष्ठित होऊन, आपेक्षिक द्रष्टा होऊन खाली असणाऱ्या सर्व प्रपंचाला निरपेक्षभावाने पाहण्यास समर्थ होत असला तरी जोपर्यंत साधक बिंदूमध्ये आपल्या अहंभावाचे पूर्णपणे विसर्जन किंवा आत्मसमर्पण करीत नाही तोपर्यंत महाबिंदू किंवा शिवभावाची अभिव्यक्ती होऊ शकत नाही. याकरिता बिंदुभाव प्राप्त केलेल्या साधकाला क्रमाक्रमाने कलेचा क्षय करता करता पूर्णपणे कलाहीन अवस्थेत जाणे भाग पडते. बिंदूच्या नंतर बिंदू-अर्ध किंवा अर्ध-चंद्र या नावाने प्रसिद्ध असलेल्या चक्राचाच उल्लेख करावा लागेल. बिंदूला चंद्र-बिंदू असे म्हटले जाते. त्यामुळे या अवस्थेचे अर्धचंद्र या नावाने वर्णन करतात. या अवस्थेतच अष्टकला शक्तीचा विकास होतो. यानंतर पुढे अर्थात् शक्तीची नवकलाही क्षीण झाल्यावर एका अवरोधमय अशा घोर आवरणस्वरूप विलक्षण अवस्थेचा उदय होतो. या अवस्थेचा किंवा स्तराचा भेद करून त्याच्यावर किंवा पलीकडे जाणे हे मोठमोठ्या देवतांनाही मोठे कठीण असते. परंतु अनुग्रहशक्तीच्या विशिष्ट प्रभावामुळे भाग्यवान् साधक या चक्राचा भेद करून त्याच्या वर किंवा पलीकडे जाण्यास समर्थ ठरतात. शास्त्रामध्ये **"रोधिनी"** या नावाने ही अवस्था प्रसिद्ध आहे. या आवरणाचा भेद केल्यानंतरच साधक नादभूमीत प्रविष्ट होतो. नाद हा चैतन्याला प्रकट करणारा असतो. त्यामुळे या अवस्थेत चित्‌शक्ती क्रमशः अधिक अधिक स्पष्ट होत जाते. ब्रह्मरंध्रामधील ज्या स्थानात नादाचा लय होतो, ते हेच स्थान आहे. त्यानंतर चित्‌शक्तीचा साक्षात् आविर्भाव होतो. या शक्तीमुळेच सर्व विश्व धारण केले जाते. या अवस्थेच्या पुढे त्रिकोणस्वरूप **"व्यापिका"** अवस्था असते. ही अवस्था बिंदूच्या विलासस्वरूपाने वामादि तीन शक्तींनी संघटित झालेली असते. त्यानंतर सर्व कारणभूत असलेल्या **"समनाशक्तीचा"** आविर्भाव होतो. ही शक्ती शिवाधिष्ठित असून ती समस्त ब्रह्मांडाचे भरणपोषण करीत असते. या शक्तीवर आरूढ झालेले

श्रीशिवच परम कारण व पंचकृत्यकारी असतात. ही चिदानंदरूप पराशक्ती आहे. हिच्या ठिकाणीच मनोराज्याचा अंत होतो. हिच्यापुढे म्हणजे समनाशक्तीपुढे मन, काल, देश, तत्त्व, देवता आणि कार्यकारणभाव इत्यादि सर्व गोष्टी नाहीशा होतात. जे साधक जपादि क्रियेच्या द्वारा नादाच्या उत्थानाचा अभ्यास करतात त्यांना आज्ञाचक्रापर्यंतच वर्णमालेचे आवर्तन होत असते, हे माहीत असते. आज्ञाचक्रापर्यंत उच्चारणाचा किंवा ऊर्ध्वचलनाचा काल एका मात्रेनेही कमी होत नाही. मात्र बिंदूत तो अर्धमात्रेपर्यंत पर्यवसित होतो. यानंतर हा काल क्रमाक्रमाने क्षीण होता होता समनाभूमीत एका क्षणात परिणत होतो. याच्या नंतर मनाचे स्पंदन शून्य होत असल्यामुळे देश, काल इत्यादि काहीही राहत नाही. या अवस्थेत सर्व मानसिक विक्षोभ किंवा कल्पनेचे जाळे अगर वावटळ शांत होत असल्यामुळे निवृत्तिभावाचा उदय होतो. अशा प्रकारची निवृत्तिभावाची अवस्था प्राप्त झाली तरीही आणि ही अवस्था देश, काल आणि निमित्ताच्या पलीकडे व मनोभूमीच्या आटोक्यात न येणारी असली तरीही वस्तुतः ही नितांत निष्कल अवस्था नसते; कारण या अवस्थेत विशुद्ध चिद्रूप कला शिल्लक राहते. या कलेलाच शास्त्रात निर्वाणकला असे म्हणतात. योगिलोक या कलेला द्रष्टा किंवा साक्षिचैतन्य असे म्हणतात. या अवस्थेलाच सांख्यलोक कैवल्य असे म्हणतात; कारण सांख्यांची प्रकृती पंचदशकलात्मक असून त्यांचा पुरुष षोडशी किंवा निर्वाणकलास्वरूप असतो.

पुरुषे षोडशकले तामाहुरमृतां कलाम् ।

या सोळाव्या कलेच्या वर गेल्याशिवाय किंवा तिचा भेद केल्याशिवाय महाबिंदू किंवा परमात्मस्वरूप शिवत्वाची प्राप्ती होऊ शकत नाही. सांख्यभूमीवरून चालत गेल्यावर म्हणजे "मी ब्रह्म आहे, देह नाही" असा अन्वय-व्यतिरेक पद्धतीने अखंड विचार करीत राहिल्यास वेदान्ताची साधना होते. अशा प्रकारे या एका कलामात्रेने युक्त असलेली निर्वाणभूमी किंवा उन्मनीभूमी ओलांडून महाबिंदुरूपी पूर्णहंतामय अवस्थेत साधकाला पदार्पण करावे लागते. पूर्णाहंतारूपी शिवभावाची प्राप्ती व स्फूर्ती झाल्यावर ज्यावेळी त्याचाही परिहार किंवा निवृत्ती होते अर्थात् ज्यावेळी बिंदूचा क्रमाक्रमाने क्षय होता होता उन्मनी अवस्थेचाही शेवट झाल्यावर बिंदू

शून्य होतो त्यावेळी पूर्णस्वरूप महाशक्तीचा आविर्भाव होतो. अर्थात् महाबिंदू पूर्ण रूपात स्थिर झाल्यावर त्यात पराशक्तीची नित्य अभिव्यक्ती होते. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाले तर असे म्हणता येईल की, महाबिंदूचा शेवट झाल्यावर परमशिवाचा आविर्भाव होतो. खरे पाहता शिवशक्ती अखंड एकरूप असल्यामुळे अर्थात् ते कधीही विभिन्न होत नसल्यामुळे आणि महाबिंदूची पूर्ण रिक्त अवस्थाही नित्यसिद्ध असल्यामुळे शून्याचा आणि पूर्णत्वाचा आविर्भाव हा नित्यसिद्ध असतो हे मानणे भाग पडते. जी रिक्त दिशा असते ती लौकिक दृष्टीने अमावस्या असते आणि जी पूर्ण दिशा असते ती लौकिक दृष्टीने पौर्णिमा असते. महाशक्तीच्या प्राधान्याचा अंगीकार करून साधना करता करता अमावस्येच्या अंगाने किंवा रूपाने जी स्फूर्ती होते ती कालीदेवीच्या उपासनेत आणि जी पौर्णिमेच्या अंगाने किंवा रूपाने स्फूर्ती होते ती षोडशी, त्रिपुरसुंदरी किंवा श्रीविद्या यांच्या उपासनेत परिणत होते. सर्व साधक समाजाला कालीकुलाचे व श्रीकुलाचे हेच गुप्त रहस्य आहे, हे ज्ञात आहे. मध्यमार्गात तारा किंवा तारिणी ही विद्या आहे. येथे याची चर्चा करावयाची नाही. येथपर्यंत जे विवेचन केले ते सर्व महाशक्तीचा अंगीकार करूनच केले आहे. मात्र प्रकाश किंवा शिवस्वरूपाच्या प्राधान्याचा अंगीकार केल्यावर त्या अवस्थेसंबंधी काहीही सांगण्यासारखे शिल्लक राहत नाही.

सकल, निष्कल आणि मिश्र या शक्तीच्या तीन अवस्था आहेत. त्यामुळे शक्तीची उपासना ही स्वभावतःच या तीन श्रेणींमध्येच अंतर्भूत होत असते. उपासनेच्या (साधनेच्या) क्रमानुसार सकल भावाची उपासना निकृष्ट आहे. मिश्रभावाची उपासना मध्यम आहे व निष्कल उपासना हीच श्रेष्ठ आहे. परंतु आपण सर्वजण लौकिक अर्थाने ज्यास सर्वसाधारणपणे उपासना किंवा साधना म्हणतो ती या तिन्ही श्रेणींपैकी कोणत्याही श्रेणीमध्ये गणली जात नाही; कारण की, जोपर्यंत श्रीसद्‌गुरूंच्या कृपादृष्टीने कुंडलिनी शक्तीचे उद्‌बोधन व तिचा सुषुम्ना मार्गात प्रवेश होत नाही तोपर्यंत उपासनेचा अधिकार उत्पन्न होत नाही. मूलाधारापासून आज्ञाचक्रापर्यंत चक्रेश्वरीरूपात शक्तीची आराधना (भक्तिसाधना) ही निकृष्ट उपासना आहे. परंतु जे साधक इंद्रिय आणि प्राण यांच्या गतीचा अवरोध करून

कुलपथात प्रविष्ट होऊ शकत नाहीत त्यांच्यासाठी देवीची अधम उपासनाही संभव नाही. साधक क्रमशः अधमभूमीपासून यथाविधी साधनेद्वारा निर्मलचित्त होऊन मध्यम भूमीच्या उपासनेचा अधिकारी होतो. त्यानंतर उत्तम अधिकार प्राप्त करून भगवंताच्या अद्वैत उपासनेने सिद्धीचा लाभ करून घेतो. मनुष्य जोपर्यंत द्वंद्वमय भेदराज्यात राहत असतो तोपर्यंत त्याच्यासाठी त्याच भूमीची उपासना करणेच स्वाभाविक (इष्ट) असते. कर्म हेच याचे रूप आहे. चतुरस्रापासून बैंदवचक्रापर्यंत किंवा मूलाधारापासून सहस्रदल कमलापर्यंत आवरण देवतादिसह समग्र देवीचक्राची उपासना ही कर्मात्मक अपरा-पूजा आहे. या पूजेचे म्हणजेच षट्चक्राच्या क्रियारूप अनुष्ठानाचे अवलंबन करून अग्रेसर न झाल्यास चित्तामध्ये कधीही अभेदज्ञानाचा उदय होऊ शकत नाही. स्वतः श्रीशंकरसुद्धा भगवतीची अपरा-पूजा करीत असतात. हा महात्म्यांचा सिद्धांत आहे. याकरिता ज्ञानी लोकांनाही चक्रपूजा ही उपेक्षणीय नाही. साधकांनी स्वतःच्या देहामध्ये विभिन्न प्रकारचे गणेश, ग्रह, नक्षत्र, राशी, योगिनी तसेच पीठ यांची विधिपूर्वक स्थापना केल्यावर ते केवळ त्याच्याच प्रभावाने साक्षात् परमेश्वर तुल्य अवस्था प्राप्त करू शकतात."

(१ - ज्या लोकांनी प्रत्यक्षपणे स्वतःच्या शरीरामध्ये देवतांची स्थापना करणे शिकून घेतलेले आहे त्यांच्या सामर्थ्याची तुलना केली जाऊ शकत नाही. या प्रकारचा मनुष्य जेव्हा न्यासरहित अशा साधारण मनुष्यास प्रणाम करील तेव्हा त्याचा मृत्यू होणे निश्चित आहे.)

कनिष्ठ भूमीच्या भक्तीच्या प्रभावाने साधकाचे अधिकारबल वाढल्यावर तो मध्यम भूमीमध्ये प्रवेश करून भेदाभेद अवस्था प्राप्त करून घेतो. तेव्हा समुच्चित ज्ञान आणि कर्म यांचा आविर्भाव होतो आणि आंतर अद्वैतधामामध्ये क्रमशः बाह्यचक्रादिकांचा लय होतो. यानंतर जेव्हा ज्ञानामध्ये कर्माची परिसमाप्ती होते तेव्हा अभेद किंवा अद्वैतभूमीची स्फूर्ती होते. त्यामुळे परापूजेचा नित्य अधिकार स्वभावतः प्राप्त होतो. एकमात्र केवळ परमशिवाची स्फूर्ती व ब्रह्मज्ञान हेच परापूजेचे दुसरे नाव आहे. ह्या ज्ञानास परमतत्त्वाच्या विकासाला लौकिक जगतामध्ये कोणी जाणू शकत नाही.

अधोमुख श्वेतवर्णीसहस्रदल कमल किंवा अकुल-कमलाच्या

अंतःकलिकेमध्ये वाग्-भव नामक एक प्रसिद्ध त्रिकोण आहे. या त्रिकोणापासून परादिक्रमाने चार प्रकारचे वाक् किंवा शब्द उत्पन्न होतात. त्यामुळे ह्याचे नाव "**वाग्-भव**" आहे. त्या त्रिकोणाच्या मध्यभागी विश्वगुरू परम-शिवांच्या पादुका आहेत. त्या प्रकाश, विमर्श तसेच या दोहोंच्या सामरस्य भेदाने एक अशा तीन प्रकारच्या आहेत. ह्या पादुकांमधून सतत परमामृत बाहेर पडत असते. ह्या स्निग्ध अमृतमय अशा चंद्ररश्मीमुळे संपूर्ण विश्वाचे संजीवन, माधुर्य-संपादन आणि तृप्ती होत असते. या पादुका समस्त जीवाच्या आत्मस्वरूप आहेत. याच्यानंतर शिवाद्वैत-भावना-रूप प्रसाद ग्रहण केल्यावर सर्व तत्त्वे ही विशुद्ध होतात. यामुळे विमल आनंदाचा उदय होत असतो. तत्त्वशुद्धी आणि आनंद संचारानंतर हृदयाकाशामध्ये ज्या परम नादाचा उदय होतो त्याचे चिंतन केले असता आद्याशक्तीच्या आनंदमय रूपाची उपलब्धी होते. साधकाच्या हृदयामधील अशा प्रकारच्या नादाची अभिव्यक्ती ही आंतर-जप किंवा मानसपूजा या नावाने प्रसिद्ध आहे. चित्ताच्या बाह्य आकर्षणापासून परत येऊन अंतर्मुखात किंवा अंतर्मनात एकाग्र झाले असता याचा अनुभव येत असतो. यामुळे अश्रू, पुलक, स्वेद, कंप इत्यादि सात्त्विक विकारांचा उन्मेष होतो. ह्या आंतरजप किंवा नादानुसंधानाच्या वेळी इंद्रिय-संचार होत नसतो. त्यामुळे याला बाह्यजप म्हणता येणार नाही. बाह्यजप हा विकल्पाचाच प्रकाशभेद असतो, परंतु आंतर-जपामध्ये विकल्पाचा व्यापार शून्य होऊन जातो. हेच निष्कल चिंतन किंवा ध्यानाचे स्वरूप आहे. वस्तुतः हे चित्ताच्या निरंतर अंतर्मुखतेशिवाय दुसरे काहीही नाही. जोपर्यंत शुद्ध चैतन्याचा संकोचभाव दूर होत नाही तोपर्यंत अशा प्रकारचे चिंतन उदित होऊ शकत नाही. परंतु चित्कलारूपी महाशक्तीचा उल्लास झाल्यानंतर आपोआप या संकोच्याचा नाश होतो. तेव्हा पूर्णाहंता शक्ती स्वतःहून विकसित होत असते. इंद्रियांना तृप्त करणाऱ्या शब्द, स्पर्श इत्यादिंच्या द्वारा आत्मदेवतेची जी पूजा केली जाते त्याला सहज उपासना म्हणतात. महायज्ञरूपाने शास्त्रामध्ये याची प्रशंसा केलेली आहे. विषयानुभवजन्य आनंद महानंदाशी मिळाल्यावर ज्या वैषम्यहीन अवस्थेचा उदय होतो, तेच भगवतीच्या उत्तम उपासनेचे प्राकृत तत्त्व आहे.

आम्ही अत्यंत संक्षेपाने शक्तिसाधनेच्या साधारण तत्त्वाच्या संबंधात काही निवेदन केलेले आहे. द्वैत, द्वैताद्वैत, अद्वैत या त्रिविध उपासना या शक्तिसाधनेच्या अंतर्गत आहेत. यामुळे सर्व देवतांची साधना, योग तसेच कर्म प्रभृती हे याच्याच अंतर्गत आहे. काली-तारा-प्रभृती भेदाने साधनेचे प्रकारभेद अप्रासंगिक समजून येथे वर्णिलेले नाहीत. बीज-तत्त्व आणि मंत्रविज्ञान, नाद-बिंदू-कलेचे स्वरूपालोचन, मंत्रोध्दार आणि मंत्रचैतन्य-प्रभृतिक्रिया, दीक्षा आणि गुरुतत्त्व, दीक्षातत्त्व, अध्वशुद्धी, भूत आणि चित्ताची शोधनक्रिया, मातृका आणि पीठ विचार, न्यास आणि प्राणप्रतिष्ठा अशा प्रकारे अनेक विषय शाक्त साधनेच्या विस्तृत आलोचना सूचीमध्ये अंतर्भूत आहेत. शक्ती उपासनेच्या संबंधात पूर्ण ज्ञान प्राप्त करण्यासाठी या सर्व प्रासंगिक गोष्टीचे ज्ञान होणे आवश्यक आहे हे वेगळे सांगावयाची गरज नाही.

श्रीअभिनवतंत्रवटधानिकेच्या तृतीयाह्निकात बाह्य सत्ता म्हणजे जगताच्या उभारणीचा विचार (३.२ ते १९) प्रस्तुत केला असून संहारणी कशी होते (२० ते २४), हे कथन केले आहे. त्याचप्रमाणे विविध दीक्षादि भेद कथन केले आहेत. या सर्व गोष्टींचा विचार "**शक्तिपातयोगरहस्य अर्थात् सिद्धमहायोगशास्त्र**" आणि "**ज्ञानेश्वरी : सिद्धयोग दर्शन**" या दोन्ही ग्रंथात मी सांगोपांग केला आहे. जिज्ञासूंनी तो अवश्य पाहावा.

इत्यलम् । श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी अनुभवामृतात "**कैवल्यकनकाचेया दाना । न कडसी थोर साना । द्रष्टेयाचेया दर्शना । पाढाउ जो ।।२.५।।**" आणि "**जो भेटलियासवे । पुरती उपायांचे धावे । प्रवृत्ति-गंगा स्थिरावे । सागरीं जिये ।।२.८।।**" असे म्हणून श्रीगुरूचा जो अपारावार महिमा वर्णन केला आहे तो नित्य स्मरणात ठेवून विश्वात्मक व विश्वोत्तीर्ण श्रीगुरुचरण अखंड हृदयात बाळगून त्यांच्या चरणस्मरणाने जीवन धन्य व कृतार्थ करावे ही प्रार्थना.

श्रीगुरुचरणरजसेवक

केशव रामचंद्र जोशी

श्रीमद् अभिनवगुप्त आचार्य विरचिता

।।तन्त्रवटधानिका।।

।।प्रथमं आह्निकम्।।

प्रणम्य गुरुमीशानं सत्तन्त्रवटधानिका।
मयाभिनवगुप्तेन स्वशक्त्युद्दीप्तये कृता।।१।।

अर्थ : - भगवान् श्रीशिवाला प्रणाम करून उत्तमतंत्ररूपी वटवृक्षाचे बीजवत् असलेली अशी तंत्रवटधानिका स्वशक्तीच्या अर्थात् आत्मशक्तीच्या म्हणजेच अनादि निद्रिस्त कुंडलिनीशक्तीच्या जागृतीसाठी किंवा ती प्रदीप्त व्हावी म्हणून मी (श्रीअभिनवगुप्त यांनी) केली आहे.

अज्ञानं बन्धने हेतुर्बन्धनं हि पुनर्भवः।
पुनर्भवश्च देहादौ वेद्ये स्वात्मत्वनिश्चयात्।।२।।

अर्थ :- अज्ञान हे बंधनाला कारण आहे. पण बंधन म्हणजे काय म्हणाल तर "पुनर्जन्म" होय. पुनर्जन्म का मिळतो? तर ज्ञान होण्याला योग्य अशा देहादि वस्तूंच्या ठिकाणी आत्मत्वनिश्चयामुळे देहादि हेच आत्मा आहेत असे मानल्यामुळे पुनः जन्माला यावे लागते अर्थात् जन्म मिळतो.।।२।।

अहं सुकृतकारीति स्वर्गादौ भोक्तृता मम।
इत्यादिदेहतादात्म्यात् स्वर्गावीच्यादिषूद्भवः।।३।।

अर्थ :- मी यज्ञयाग-स्वाध्यायादि पुण्यकर्मे करणारा असल्याने स्वर्ग-अवीची (पुण्यलोक?) इत्यादि ठिकाणी भोक्ता होऊ शकतो अर्थात् तेथील सुखोपभोग मलाच भोगावयाला मिळतात इत्यादि देहतादात्म्यामुळे स्वर्गादिभोगाला योग्य असे जन्म (शरीरे) मिळतात.।।३।।

अतोऽनात्मनि देहादौ गलिते स्वात्मनिश्चये।
घटादिवदनात्मेति देहादि स्थितमप्युमम्।।४।।

पश्यतः पूर्वसंस्कारक्षयाद्देहे क्षयं गते।
अन्योचितस्वसंस्काराभावाद्देहः कथं भवेत्।।५।।

अर्थ :- याकरिता अनात्मरूप देहादिवस्तूविषयींचा आत्मभाव (आत्मदृष्टी) नाहीसा झाला की, प्रत्यक्ष अशा देहादिवस्तूंचा अनुभव घेत असतानाही पूर्वसंस्कारांचा क्षय झाल्याने देहाचाही क्षय होतो आणि अन्योचित म्हणजे आत्मत्त्वरहित अशा ठिकाणी आत्मत्वभावना नसल्याने देहोत्पत्ती कशी होईल? अर्थात् होणार नाही म्हणजे पुनर्जन्म मिळणार नाही. ।।४।।५।।

देहाभावेऽपि वै तस्य प्राणधीशून्यगोचरे।
आत्मसंस्कारसद्भावे भवेत्तद्रूपता परम्।।६।।

अर्थ :- देहप्राप्ती थांबली तरी प्राण-मन-बुद्ध्यादि हे सारे आत्मे आहेत असा संस्कार जर शिल्लक राहील तर प्राण-बुद्धि-शून्य इत्यादींशी तद्रूपता येते. प्राणादि हेच आत्मे वाटायला लागतात.।।६।।

प्राणदावपि तु ध्वस्ते स्वात्मभावे परिस्फुटम्।
सर्वावच्छेदहीनं तदात्मतत्त्वं प्रकाशते।।७।।

अर्थ :- प्राण-बुद्धी इत्यादि ठिकाणचा आत्मभाव हे आत्मे आहेत अशी भ्रमभावना (भ्रांती) नष्ट झाली की सर्वोपाधिरहित अशी आत्मवस्तू प्रकाशित होते, ज्ञात होते.।।७।।

अनवच्छिन्नरुपत्वादसंवेद्यं तदुच्यते।
अवच्छेदाज्जडं वेद्यमन्याधीनप्रकाशकम्।।८।।

अर्थ :- ती आत्मवस्तू ज्ञानाला गोचर होणारी नाही; कारण ती निरुपाधिक स्वरूपाची आहे आणि ज्ञानाच्या टप्प्यात येणारी वस्तू उपाधिसंबंधामुळे जड असून परप्रकाशाने समजणारी म्हणजे पराधीन-प्रकाशी अशी आहे.।।८।।

स्वप्रकाशैकरूपत्वाद् भावात्मत्वेन भासनात्।
तथात्वेऽपि स्वतन्त्रत्वाच्छक्तिमान् स शिवः स्मृतः।।९।।

अर्थ :- ही आत्मवस्तू म्हणजे (शिवः) परात्पर, परब्रह्म, सदाशिव हा स्वयंप्रकाशस्वरूप असल्याने सर्ववस्तूत व्यापकत्वाने भासत असल्याने

आणि असा असूनही स्वतंत्र असल्यामुळे हा शिव शक्तिमान् म्हणवितो. (म्हणजे आहेच.)।।९।।

सर्वात्मभूतः सर्वाध्वसमुत्तीर्णः स्वतन्त्रकः।
स्वशक्त्या भासितानन्तविश्वः स परमेश्वरः।।१०।।

अर्थ :- हा परमेश्वर सर्वांचा आत्मा आहे. हा सर्व मार्गांच्या पलीकडे असणारा व स्वतंत्र असून स्वशक्तीने अनंत-अपरिमित विश्वांचा-सृष्टींचा भासक म्हणजेच प्रकाशक किंवा दर्शक असा आहे.।।१०।।

स एष सत्यतो मुक्तः सर्वाच्छेदवर्जनात्।
अन्ये न तत्त्वतो मुक्ता अवच्छेदांशसंभवात्।।११।।

अर्थ :- हा (तो) परमेश्वर सर्व सत्यासत्यापासून मुक्त आहे. याचे कारण देश-काल-वस्तुपरिच्छेद (उपाधी) त्या परमशिवास नाहीत. अमक्या देशात, अमक्या काळात, अमक्या वस्तुरूपात तो आहे असे नाही; तर तो सर्वत्र, सर्वदा, सर्वरूपी असा आहे. इतर कोणीही देव-देवता तत्त्वतः मुक्त नाहीत; कारण उपाधिअंश तिथे संभवतो.।।११।।

अतो यावन्न सर्वस्मिन् वेद्ये वेद्यतया गतिः।
तावद्वेद्यांश एकस्मिन् भवेत्स्वात्मत्वनिश्चयः।।१२।।

अर्थ :- याकरिता जोपर्यंत सर्व ज्ञेयवस्तूंविषयी हे वेद्य (ज्ञेय) आहेत असे ज्ञान होत नाही, तोपर्यंत वेद्यवस्तूच्या एका अंशावर स्व-आत्मत्व हे आत्मा आहे असा निश्चय होईल. आत्मज्ञान होईपर्यंत आत्मव्याप्त अशा देह-प्राणादि सर्व वस्तूंविषयी आत्मत्त्वनिश्चय होईल.।।१२।।

यदा तु धरणीतत्त्वाच्छिवान्तं तत्त्वपञ्जरम्।
अवच्छिन्नं भवेद्वेद्यमनन्योन्यात्मकं स्फुरत्।।१३।।
तदा तावति संवेद्यजाते वेदकमस्य यत्।
इयतस्तदवच्छेदहीनं भाति परं शिवम्।।१४।।

अर्थ :- जेव्हा धरणीतत्त्वापासून शिवापर्यंतचा तत्त्वसमुदाय उपाधियुक्ततेमुळे ज्ञेय होतो आणि तो वेगळा नसून अन्यात्मक होऊन स्फुरतो तेव्हा तेवढ्या वेद्यवस्तूंचा जो ज्ञाता तो तेवढाच निरुपाधिक शिवपरमेश्वर भासतो.।।१३।।१४।।

तत्प्रकाशं प्रमातृत्वान्नेतरन्मेयभावतः।
मेयत्वमस्यावच्छेदात्स ह्यवच्छेदके सति।।१५।।
तदेवं च धरातत्त्वाच्छिवान्तं मातृ नेतरत्।
अमातृभावादेवान्यदप्रकाशात्मकं स्थितम्।।१६।।

अर्थ :- ते शिवतत्त्व प्रकाशमय (रूप) असल्याने ज्ञातृत्ववान्, यथार्थ ज्ञानवान् अशा स्वभावाचे आहे. यावाचून इतर सर्व काही ज्ञानयुक्त नसल्याने प्रकाशस्वभावी नाही. तमःस्वरूपीच राहिले आहे.।।१५।।१६।।

अप्रकाशं च नास्त्येव सत्ता प्राकाश्यमेव हि।
ततश्चायं प्रकाशत्वात् स्वयं सत्तास्य नोचिता।।१७।।

अर्थ :- इतर वस्तू अप्रकाशात्मक म्हणता पण अप्रकाशच नाही; कारण (इतरांची) सत्ता म्हणजे प्रकाशयोग्यत्व होय. म्हणून हा शिव स्वयंप्रकाश असल्याने याला सत्ता म्हणजे इतर प्रकाशयोग्यत्व आहे असे समजणे अयोग्य होय.।।१७।। किंवा दुसरा आक्षेप व त्याचे समाधान-

पराधीनैव सत्तास्य पराधीनप्रकाशनः।
परिच्छेदप्रकाशस्तत् सोऽपि तत्तुल्य एव यत्।।१८।।

अर्थ :- या शिवाची सत्ता ही पराधीन आहे व प्रकाशही पराधीन आहे असे मानल्यास प्रकाशाची त्याला उपाधी आहे असे कल्पावे लागेल. (पण हा शिव तर देशादि उपाधिरहित आहे हे श्रुतिसिद्ध आहे) आणि शिवही इतर वस्तूप्रमाणे सोपाधिक ठरेल.।।१८।।

अतः प्रकाशाधीना चेत्सत्तास्मिन् सार्वकालिकी।
नूनं प्रकाश एवास्ति योऽवच्छेदविवर्जितः।।१९।।

अर्थ :- या शिवाचे अस्तित्व प्रकाशाधीन आहे असे गृहीत धरल्यास ते अस्तित्व सर्वकाळी म्हणजे नेहमीचेच आहे म्हणून निरुपाधिक प्रकाश हेच त्याचे स्वरूप मानावे.।।१९।।

तत्र प्रकाशे भान्त्येते स्वावच्छेदनियन्त्रिताः।
भावाः प्रकाशस्वातन्त्र्याद् विचित्राकार बृंहिताः।।२०।।

अर्थ :- त्या प्रकाशामध्ये या सर्व चराचर वस्तू भासतात. (दिसतात

अर्थात् त्यांचे भान होते.) ते पदार्थ स्वतःच्या उपाधीने मर्यादित आहेत आणि प्रकाशस्वातंत्र्यामुळे (तात्पुरत्या) भिन्नभिन्न आकारात दृग्गोचर होतात. (किंवा भिन्नरूपात सृष्टीत नांदतात) ।।२०।।

यथा च तेऽवभासन्ते तथा तदुचिताः पुनः।
तेषां प्रकाशका भान्ति सुरान्तास्तिर्यगादयः।।२१।।

अर्थ :- जशा त्या वस्तू (भाव) भासतात तसेच त्यांना योग्य असे पशूंपासून देवादिपर्यंतचे त्यांचे प्रकाशकही भासतात.।।२१।।

प्रकाशकत्वाच्चैतेषां शिवात्मत्वेऽपि सुस्फुटे।
वेद्याश्चान्योन्यतश्चायमवच्छेदोऽस्ति यत्नतः।।२२।।

अर्थ :- पश्वादि (मनुष्यजीव) देवांपर्यंतच्या सर्वांना शिवात्मत्व हे (शिवरूपत्व किंवा शिवव्याप्यत्व-शिवाने व्यापलेले) अत्यंत स्पष्ट असले तरी ते सारे एकमेकाहून वेगळे ज्ञात होतात; कारण प्रयत्नाने त्याची उपाधी अर्थात् भेदक कारणे समजतात.।।२२।।

अप्रकाशत्वमप्यस्ति तत्प्रकाशप्रकाश्यताम्।
गतास्ते पशवो भान्ति शिवस्यैव स्वशक्तितः।।२३।।

अर्थ :- त्या पशूंमध्ये प्रकाशभावही आहे; परंतु शिवप्रकाशाने प्रकाशित झालेले (जीव) पशू भासतात; पण शिवाच्याच स्वशक्तीमुळे त्यांना प्रकाश मिळालेला असतो म्हणून ते भासतात.।।२३।।

अवच्छेदांश एतेषां स्वप्रकाशश्च यः स्फुटः।
स विचित्रस्वभावत्वाद्देहप्राणादितां गतः।।२४।।

अर्थ :- या पशूंचा उपाध्यंश म्हणून जो स्व (त्यांचा) प्रकाश आहे तो स्पष्ट असून, विचित्रस्वभावविशेषामुळे तो (प्रकाश) देह-प्राण-इंद्रियांच्या ठिकाणी संक्रांत झाला आहे. (सर्वत्र प्रकाश असून तो शिवाचाच आहे.)।।२४।।

देहादेरपि वैचित्र्याद्देवतिर्यङ्मनुष्यता।
वैचित्र्यान्तरतोऽत्रापि चैत्रमैत्रादिरूपता।।२५।।

अर्थ :- देहेंद्रियांच्या विचित्र आकारांमुळे देव-पशू-पक्षी-मानव हे भेद

पडले आहेत आणि मानवातील आकार इत्यादि वैचित्र्यामुळे चैत्र-मैत्रादि भिन्नरूपे झाली आहेत.।।२५।।

यथा च पशवो भान्ति तथा केचन तां निजाम्।
अप्रकाशदशां घ्नन्ति देहप्राणतदात्मताम्।। २६।।

अर्थ :- पशू जे अप्रकाशरूपात भासतात तसे काही पशू (जीव-मानव) देह प्राणादिकांशी तादात्म्य पावलेल्या अप्रकाशावस्थेचा नाश करतात.।।२६।।

ते प्रबुद्धाश्च (पशवो) पतयो जीवन्मुक्ता महर्षयः।
तेषां तत्तारतम्येन गुरुशिष्यादिता स्थिता।। २७।।

अर्थ :- असे मानव प्रबुद्ध-ज्ञानी समजावेत. त्यांना पती म्हणावे. ते जीवन्मुक्त महर्षी होतात. त्यांच्यामधील ज्ञानित्वाच्या तारतम्याने गुरु-शिष्यभाव मानावा लागतो. अधिक ज्ञानी हा गुरू व बेताचा ज्ञानी हा शिष्य असे समजावे.।।२७।। (आता सृष्ट्यादि पंचकृत्ये सांगतात)

तदेवं भेदभोक्तृत्वं सृष्टिः, तत्स्थिरता स्थितिः।
अंशेन न्यक्क्रिया तस्य संहारोऽनुग्रहः पुनः।। २८।।
अप्रकाशदशाध्वंसस्तदुपायैकलग्नता।
हृदयान्निन्दनं तस्य तत्सेवा तत्तिरोहितिः।। २९।।

अर्थ :- तर अशा रीतीने प्रकाशाप्रकाशभेदानुरूप गुरुशिष्यादि भोक्तृत्व याला सृष्टी म्हणावे. ही स्थिती स्थिर असणे याला स्थिती म्हणावे. या स्थितीचा अंशतः (ज्ञानपूर्वक किंचित्) लोप (तिरस्कार) तो संहार म्हणवितो. अप्रकाशावस्थेचा नाश याला अनुग्रह म्हणावे. अप्रकाशदशा नष्ट करण्याच्या प्रयत्नात असणे व मनाने ही दशा निंद्य समजणे व ती भोगणे याला तिरोधान म्हणावे.।।२८।।२९।।

(प्रसिद्ध असे सृष्टी-स्थिती-संहारादि इथे अभिप्रेत नाहीत.)

एवंविधं पंचकृत्यं भासयन् परमेश्वरः।
यदाभाति तदेवास्य चित्त्वमैश्वर्यमुच्यते।। ३०।।

अर्थ :- तो परमेश्वर शिव अशा प्रकारचे पंचकार्य (पाच गोष्टी)

भासवीत जेव्हा प्रकट होतो तेव्हा त्याचे चेतनत्व-ज्ञानत्व (किंवा हालचाल-व्यापार) हे ऐश्वर्य म्हणविते.।।३०।।

तथाविधप्रकाशांशध्वंसः कस्याप्युपायतः।
विनैव कस्यचिच्चित्रैरुपायैः संस्क्रियादिभिः।।३१।।

अर्थ :- अशा प्रकारच्या प्रकाशांशाचा (अप्रकाशांशाचा) नाश होतो व काही जीवांना हा प्रकाश उपायावाचून प्राप्त होतो आणि काहींना वेगवेगळ्या संस्कारादिकांचे साहाय्य घ्यावे लागते.।।३१।।

तदेवं वेद्यरूपत्वाद् बोद्धृत्वं बन्धमुक्तता।
इयतः सकलस्यात्मा प्रकाशोऽभ्यधिकस्ततः।।३२।।

अर्थ :- अशा रीतीने वेद्य (ज्ञेयरूपाने) रूपामुळे ज्ञातृत्व, बंधन, मुक्ती वगैरे (अवलंबून) आहे. या सर्वांचा आत्मा प्रकाश आहे व सर्वांहून अधिक प्रकाशमान आहे.।।३२।।

सर्वातिरिक्तः सर्वात्मा स्वतन्त्रः सर्वशक्तिकः।
सर्वपूर्णोऽनवच्छिन्नप्रकाशो भैरवः पुनः।।३३।।

अर्थ :- हा भैरवदेव सर्वांहून वेगळा, सर्वात व्यापक, स्वतंत्र, सर्वशक्तिसंपन्न, सर्वात परिपूर्ण भरलेला, निरुपाधिक प्रकाशयुक्त आणि सर्वांच्या पलीकडचा आहे.।।३३।।

यद्रूपत्वं परा मुक्तिः पुनरावृत्तिवर्जिता।
अन्यास्तु धीप्राणशून्यधियो जन्मक्षयोचिताः।।३४।।

अर्थ :- भैरवाच्या रूपात पुनरावृत्तिरहित श्रेष्ठ मुक्ती साठविलेली आहे. अन्य देवता या (धी) बुद्धि-प्राण-शून्य असे ज्ञान असलेल्या, जन्म-मृत्यूने व्यापलेल्या व विकारांनी युक्त अशा आहेत.।।३४।।

शून्यं धीः प्राण इत्येतत् सृज्यते क्षीयतेऽपि च।
स्थैर्यमस्य परं देहापेक्षया न तु तत्त्वतः।।३५।।

अर्थ :- शून्यादि भाव उत्पन्न होतात व क्षीण होतात. यांचे स्थैर्य, स्थिरत्व-चिरकालत्व हे देहाच्या अपेक्षेने अधिक आहे. परंतु वास्तविकदृष्ट्या पाहिले असता ते नसते. (इतर देहात बुद्धी, प्राण इत्यादि असतात.

वासनादि रूपाने स्थैर्य कसे असेल?)।।३५।।

अतः षट्त्रिंशदन्तःस्थे तत्त्वे स्वात्मत्वनिश्चयात्।
वेद्यांशे मुक्तिरस्य स्यादावृत्तिः सोर्ध्वतः परम्।।३६।।

अर्थ :- यामुळे छत्तीस अन्तस्थ तत्त्वांमध्ये ज्ञाता आत्मत्वनिश्चयामुळे वेद्यांशापुरती मुक्ती मिळवितो. ती पुनरावृत्तियुक्त राहील. ही खरी मुक्ती नव्हे. ऊर्ध्वादि स्वर्गस्थानापासून पुनः खाली यावे लागते.।।३६।।

यदा समस्तवेद्यांशसमुत्तीर्णं परं महः।
भाति मुक्तस्तदेवासौ भैरवः परमः स्मृतः।।३७।।

अर्थ :- ज्यावेळी सर्व वेद्यांशाच्या अर्थात् ज्ञेयाच्या अंशाच्या पलीकडे असणारे परमतेज अनुभवास येईल व साक्षात् होईल त्यावेळी तो साधक मुक्त होतो व परमभैरवाच्या पदवीला प्राप्त होतो.।।३७।।

इति श्रीमदभिनवगुप्ताचार्य विशेषविरचितायां
तन्त्रवटधानिकायां प्रथमाह्निकम्।।१।।

।।द्वितीयमाह्निकम्।।

J gurlu TVD 2-1-2
II, 513 in TA 2-2

उपायैर्न शिवो भाति भान्ति ते तत्प्रसादतः।
स एवाहं स्वप्रकाशो भासे विश्वस्वरूपकः।।१।।

अर्थ :- योगादि उपायांनी शिवाचे भान अर्थात् ज्ञान प्रत्यक्ष होत नाही तर उलट शिवाच्या कृपाप्रसादाने ते साधनीभूत उपाय सुचवितात. तोच मी स्वप्रकाश व विश्वस्वरूपी शिव आहे.।।१।।

इत्याकर्ण्य गुरोर्वाक्यं सकृत्केचन निश्चिताः।
विना भूयोऽनुसंधानं भान्ति संविन्मया स्थिताः।।२।।

अर्थ :- असे श्रीसद्‌गुरुवाक्याचे एकदाच श्रवण झाले तरी काही अधिकारी साधकांना "शिवस्वरूप मीच आहे" असा निश्चय होतो आणि वारंवार अनुसंधानावाचूनही ते ज्ञानमय होऊन राहतात व राहिले आहेत.।।२।।

यथादर्शे घटादीनां स्थितिर्मिश्रेतरात्मिका।
चिदात्मनि तथामीषां भावानां चित्ररूपिणी।।३।।

अर्थ :- जसे आरशामध्ये प्रतिबिंबित घटादि वस्तूंचे अस्तित्व किंवा स्वरूप मिश्रामिश्रात्मक असते तसेच चिदात्म्यात प्रतिबिंबित या सर्व वस्तूंचे (पशु-जीवांचे) स्वरूपचित्र विविध रूपाचे असते.।।३।।

आदर्शस्तु जडत्वान्न स्वतन्त्रो भासते यथा।
अहंप्रकाशरूपत्वात्स्वतन्त्रो भासते तथा।।४।।

अर्थ :- आरसा हा जड, अचेतन, परप्रकाशित असल्याने तो स्वतंत्र भासत नाही. तसे शिवाचे नाही. तो अहं (स्वयं) प्रकाशरूप असल्याने स्वतंत्र भासतो व प्रत्यक्ष होतो.।।४।।

इत्येवं गुरुतः श्रुत्वा वाक्यं तद्‌भावनाक्रमात्।
भूयोभूयोऽनुसन्धानात् कोऽपि याति तदात्मताम्।।५।।

अर्थ :- अशी उदाहरण संयुक्तिक वाक्ये श्रीसद्‌गुरुमुखाने ऐकून क्रमशः तशी भावना करून तसेच वारंवार चिंतनादि करून एखादा शिवात्मतेला पावतो व शिवरूप होतो.।।५।।

नाहं देहात्मको नाहं कर्माधीनो न मे मलः।
नात्येन प्रेरितोऽस्मीति किं त्वेतद्विपरीतकम्।।६।।

अर्थ :- मी देहात्मक-देहरूपी नाही. कर्माच्या आधीनही मी नाही व कर्मपरतंत्रही नाही. माझ्या ठिकाणी आणव-कार्मणादि मल नाहीत; तसेच माझ्याकडे कामादि मनोवृत्ती नाहीत. माझा प्रेरकही दुसरा कोणी नाही किंवा कोणीही मला इकडे प्रेरणा करीत नाही. हे आश्चर्यकारक नाही काय?।।६।।

इत्थं विकल्पं संस्कृत्य स्पष्टविद्यात्मतां नयन्।
कश्चिद्याति समावेशं धन्यः श्रीगुरुवाक्यतः।।७।।

अर्थ :- अशा रीतीने विकल्पाचे संस्करण करून त्या विकल्पाला स्पष्ट विद्येचे स्वरूप देऊन एखादा साधक श्रीगुरुवाक्याने समावेश प्राप्त करून घेतो. तो साधक धन्य होय.।।७।।

स्वप्रकाशं ममस्तात्मतत्वं मात्रादिकं त्रयम्।
अन्तःकृत्य स्थितं ध्यायेद्धृदयानन्दधामनि।।८।।

अर्थ :- स्वप्रकाश, सर्वत्र व्यापून असणारे तत्त्व, प्रमाता-प्रमेय-प्रमाण ह्या त्रिपुटीरूपाचे तत्त्व किंवा अकार-उकार-मकारात्मक ॐकाररूपी तत्त्व हे अंतःकरणात सदैव असून साधकाने याच तत्त्वाचे ध्यान करावे. हे तत्त्व हृदयातील आनंदस्थानात व सात्त्विक भागात उपलब्ध होणारे आहे. त्या स्वप्रकाशादि विशेषणाविशिष्ट अशा तत्त्वाचे ध्यान करावे.।।८।।

तद्द्वादशमहाशक्तिरश्मिचक्रेश्वरं विभुम्।
व्योमभिर्निःसरद्बाह्ये ध्यायेत् सृष्टिं स्थितो दधत्।।९।।

अर्थ :- जो द्वादशमहाशक्तींच्या समुदायांचा ईश्वर-स्वामी नियंता म्हणजेच नियमन करणारा आहे आणि जो चक्षुःश्रोत्रादि आकाशरूप पोकळीतून बाहेर येऊन सृष्टीत राहून तिचे धारण करतो अशा त्या व्यापकाचे (ईश्वराचे) ध्यान करावे.।।९।।

पश्चाद्ग्रस्तसबाह्यान्तर्भावमज्ञानमात्मनि।
विश्राम्येत्पुनरप्येव ध्यानाभ्यासात् प्रथात्मनः।।१०।।

अर्थ :- त्यानंतर आत्मस्वरूपात विश्रांती घेणाऱ्या त्या विभु-व्यापकाचे

ध्यान करावे. ज्या व्यापक तत्त्वाने अंतर्बाह्यस्थित अज्ञानाला ग्रासून टाकले आहे त्याचे ध्यान ज्ञानरूपामध्ये वारंवार करावे किंवा ज्या अज्ञानाने सर्व चराचर सृष्टीला आपल्या आवरणाने ग्रासून टाकलेले आहे त्याला ज्ञानरूप आत्म्यामध्ये विश्रांती द्यावी. (असे केले म्हणजे ते अज्ञान स्व-स्वरूप टाकून ज्ञानात परिवर्तित होते.) असा आत्मध्यानाचा अभ्यास सतत चालू ठेवावा.।।१०।।

प्राणो बोधमयः पूर्वं तत उल्लसति स्फुटम्।
मेयं पूरयते तेन स क्रमैक्यं प्रपद्यते।।११।।

अर्थ :- या ध्यानाभ्यासामुळे प्रथम प्राण हा ज्ञानमय होऊन स्पष्ट उल्हासित होतो अर्थात् प्रकट होतो. तो प्रमेयाला व्यापून टाकतो व क्रमाने प्रमेयाशी एकरूप होतो.।।११।।

तदेव संजिहीर्षेत संहत्यापूर्णतां नयेत्।
एतावदनुसंधत्ते सप्त विश्रान्तयस्त्विमाः।।१२।।

अर्थ :- त्याच वेळी त्या प्रमेयासह प्राणाचा उपसंहार करून तो पूर्णतेला न्यावा. असेच अनुसंधान ठेवावे. पुढील सात ठिकाणे विश्रांती घेण्याची आहेत.।।१२।।

उन्मिषत्तोन्मिमिषता संघजैरेकविंशतिः।
आनन्दः उद्भवः कम्पो निद्रा......... ।।१३।।

अर्थ :- निमेष, उन्मेष (अर्धोन्मीलित नेत्रावस्था), संघजैः एकविंशतिः म्हणजेच एकवीस वेळा श्वासोच्छ्वास किंवा नेत्राची उघडझाप एकवीस वेळा करणे, आनंद, हर्ष, उद्भव, रोमांच, कंप व निद्रा ही विश्रांतिस्थाने आहेत.।।१३।।

तत्रोत्तरात्तरावेशभेदात् पञ्चोत्तरं च यत्।
तत्रापि त्रितयं मुख्यं सृष्टिसंहारबीजकम्।।१४।।

अर्थ :- त्यापैकी उत्तरोत्तर आवेशभेदाने विश्रामस्थाने असली तरी शेवटची पाच मुख्य आहेत. (ही स्थाने सृष्टीस्थित्यादि असे म्हणून पहिल्या आह्निकात वर्णिलेली आहेत.) त्यामध्येही सृष्टिसंहाराचे बीजभूत असलेली अशी तीन प्रमुख आहेत.।।१४।।

योगिनीहृदयानन्दव्योमभूसम्प्रदायतः।
अव्यक्तेतरयुग्मात्मलिङ्गतादात्म्ययोगतः।।१५।।
श्रीमदाचार्यचक्रस्थो मन्त्रवीर्यं तदुत्तमम्।
अष्टोत्तरशताविष्टं मन्त्राः प्राणपथे यतः।।१६।।
एवं धीप्राणसंघट्टद्वारेणान्तः समाविशन्।
शाम्भवीं परमां धारामाणवेन प्रपद्यते।।१७।।

अर्थ :- योगिनी हृदयाला आनंद देणाऱ्या आकाशरूप आश्रयाच्या संप्रदायामुळे आणि अव्यक्त व व्यक्त या जोडीने युक्त अशा आत्मलिंगाशी तादात्म्य पावणाऱ्या योगामुळे श्रीमदाचार्यांच्या समुदायामध्ये, मंडलात वा सान्निध्यात राहणारा भाग्यवान् साधक उत्तम मंत्रसामर्थ्य मिळवितो. हे एकशे आठ मंत्रसंख्येत भरलेले आहे. प्राणमार्गात अनेक मंत्र आहेत. अशा रीतीने बुद्धी व प्राण यांच्या संघर्षाने व मिश्रणाने वरील साधक मंत्रबल मिळवून अंतर्मनात प्रवेशून आणवदीक्षेने वा मार्गाने परमश्रेष्ठ पद अशा शांभवीधारेला मिळवितो व शंभू अनुग्रहाधिकारी होतो.

तदेवं त्रिविधं प्राप्य गुरोरावेशमुत्तमम्।
गुरुमभ्यर्चयेद्धीमान् देहसर्वस्वदानतः।।१८।।

अर्थ :- अशा रीतीने श्रीसद्गुरूपासून तीन प्रकारचे आवेश (मांत्रावेश-आणवावेश-कार्मणावेश किंवा शांभवावेश) मिळवावेत आणि देह झिजवून सेवा करून सर्वस्व अर्पून श्रीगुरुदेवांची पूजा करावी.।।१८।।

नैनं प्रकोपयेन्नास्य वाक्यं किंचन् लङ्घयेत।
अविचारितमस्याज्ञां कुर्याज्ज्ञानं स्थिरं तथा।।१९।।

अर्थ :- त्या श्रीगुरुदेवांना राग येईल असे चुकूनही वागू नये. त्यांचे वचन मोडू नये अर्थात् ते ऐकावे म्हणजे ते सांगतील त्याप्रमाणे वागावे. त्यांनी केलेल्या आज्ञेविषयी तर्कादि करीत आपले शहाणपण चालवू नये. असे वागल्यास ज्ञान स्थिर होईल व जन्म सार्थक होईल.।।१९।।

इति श्रीमदभिनवगुप्ताचार्यविशेषविरचितायां तन्त्रवटधानिकायां द्वितीयमाह्निकम्।।२।।

।। तृतीयमाह्निकम् ।।

एवमाभ्यन्तरी सत्ता शिवतादात्म्यदायिनी।
यथा भवेत्तथा प्रोक्तं बाह्येदानीं निगद्यते।।१।।

अर्थ :- अशा रीतीने शिवस्वरूपप्राप्ती करून देणारी आंतरिक सत्ता (दीक्षा वा ज्ञान) ज्या दृष्टीने होईल, तशी सांगितली. आता बाह्यसत्ता सांगितली जाईल.।।१।।

बाह्यो भेदो द्विधा दृष्टः क्रियातो रूपतस्तथा।
एकस्मिन्नपि कालात्मा तत्राद्यो देशतः परम्।।२।।

अर्थ :- क्रियेमुळे व रूपामुळे बाह्यभेद दोन प्रकारचा आहे. प्रत्येकात किंवा एका भेदातही पहिला कालरूप व देशामुळे किंवा देशरूप असे दोन प्रकार पडतात.।।२।।

क्रियास्वात्मपरिस्पन्दस्ततः प्राणोऽथ तत्कृतम्।
कालवैचित्र्यमित्येवं संवित्स्पन्दाधिकं नहि।।३।।

अर्थ :- क्रिया म्हणजे जीवात्म-आत्मस्वरूपाची चलनादि क्रिया. त्यापासून प्राणवायूची श्वासोच्छ्वास-अन्नप्राशनादिक्रिया व क्षणादिकाल-वैचित्र्यदिव्यवहार होय. संवित्-ज्ञान याचे स्पंदन हे वेगळे आहे.हे बुद्धिस्पंदन अधिक म्हणजे वेगळे आहे.।।३।।

यथा संविद् घटात्मासौ चिदात्मेति तरङ्गिता।
शक्तिस्तथा विचित्रोऽयं सृष्टिसंहारविभ्रमः।।४।।

अर्थ :- ज्याप्रमाणे संविद्-बुद्धी ही घटात्म्यापासून चिदात्म्यापर्यंत शक्तिरूपात पसरली आहे त्याप्रमाणे हा सृष्टीपासून संहारापर्यंतचा विभ्रम-आभास चित्र विचित्र प्रकारचा आहे.।।४।।

स्वप्नसंकल्पमायांशक्रियावैचित्र्यचित्रितः।
विचित्रः काल एकोऽयं संसारस्पंद ईदृशः।।५।।

अर्थ :- स्वप्न (झोप व स्वप्न) संकल्प (मनाचे कार्य) मायांश (विचित्र घटना करणारी तिचा विभाग) जीवनस्पंदादिक्रियावैविध्य यांनी चित्ररूप असलेला विचित्र असा काल हा एक संसारस्पंद आहे. क्रियात्मक सृष्टीची हालचाल अशी आहे.।।५।।

प्राकृतं पार्थिवं वैश्वं शाक्तं चाण्डचतुष्टयम्।
विचित्रदेशभुवनतत्त्वात्मकमिदं स्फुरत्।। ६।।

अर्थ :- प्रकृतीपासून झालेले, पृथ्वीपासून झालेले, विश्वापासून (विष्णु-व्यापकामुळे) झालेले व शक्तीपासून झालेले असे चार प्रकारचे जगत् आहे. ते चित्रविचित्रदेश-लोक-तत्त्व याने भरलेले किंवा तद्रूप होऊन स्फुरण पावते.।।६।।

ममैवान्तरतः सर्वदेशकालात्मिकां भिदाम्।
अन्तःकृत्याहमेवैक इति ज्ञानाद्विमुक्तता।। ७।।

अर्थ :- "माझ्यामध्येच सर्व प्रकारचे देशकालात्मक भेद सामावलेले असून ते सर्व मीच आहे, ते सारे मद्रूप आहेत किंवा त्या सर्व रूपांनी मी एकटाच नटलेला आहे," असे ज्ञान होऊन ते स्थिर झाले की, साधक मुक्त होतो.।।७।।

यावद्विचित्रं बाह्यं हि तत्र षट्त्रिंशतः परम्।
मानसं वेत्ति विश्रान्त्या विना संविन्मयं यतः।।८।।

अर्थ :- बाह्य-दृष्टिगोचर होणारे जे विचित्रवस्तुमय जगत् आहे ते छत्तीस तत्त्वांहून वेगळे नाही आणि मानस म्हणजे आंतर-जगत् सर्व संविन्मय-बुद्धिमय (बुद्धिगम्य) आहे हे सहज तो (वरील साधक) जाणू शकतो.।।८।।

कठिनं द्रवमत्युष्णं स्पर्शं च सावकाशतः।
पञ्च भूतानि चित्राणि तन्मात्राणि तु तद्गुणाः।।९।।

अर्थ :- पंचमहाभूते कठिणता, द्रवता, अत्युष्णता, स्पर्शत्व आणि पोकळी असणे या स्वरूपांनी ओळखली जातात व सूक्ष्मतन्मात्रा या त्यांचे गुण होत.।।९।।

गन्धो रसो रूपमथ स्पर्शः शब्दो विशेषकः।
एतेषां ग्राहकं चाक्षं पञ्चधा ज्ञानशक्तिजम्।।१०।।

अर्थ :- गंध (पृथ्वीचा), रस (जलाचा), रूप (तेजाचा), स्पर्श (वायूचा), शब्द हा (आकाशाचा) विशेष गुण आहे. या सर्व गुणांचे ग्रहण करणारी इंद्रिये पाच प्रकारची आहेत, ती ज्ञानशक्तीसंबंधी आहेत.।।१०।।

क्रियाशक्त्युत्थमन्यच्च तत्कर्मेन्द्रियपञ्चकम्।
संकल्पनिश्चयौ मानस्तदन्तःकरणत्रयम्।।११।।

अर्थ :- क्रियाशक्तीने युक्त असी कर्मेंद्रिये पाच आहेत. संकल्प-निश्चय-मान (अभिमान-अहंकार) असे अंतःकरणत्रय आहे.।।११।।

इयतो वेद्यजातस्य यदभिन्नं वपुः पुरा।
तत्प्रधानमियद्वेद्यं जडं तद्वेदकः पुमान्।।१२।।

अर्थ :- या सर्व प्रमेयसमूहाशी हे शरीर अभिन्न आहे म्हणजे या शरीरात ही तत्त्वे आहेत. हे ज्ञेयवस्तूंमध्ये मुख्य असून जड-अचेतन (ज्ञानरहित) असे आहे व जीवात्मा (पुरुष) त्याचा ज्ञाता म्हणजे जाणणारा आहे.।।१२।।

सोऽप्रकाशप्रकाशात्मा षट्कञ्चुकपरिष्कृतः।
किंचित्करोति जानाति तच्चेदं शक्तिमानिह।।१३।।

अर्थ :- तो (ज्ञाता) अप्रकाश व प्रकाश हे दोन्ही ज्याचे रूप आहे असा व सहा कोशांनी (आवरणांनी) व्याप्त किंवा आवृत असा आहे. (अन्नमय-प्राणमयादिकोश या जीवात्म्याला सुरक्षित ठेवतात.) तो काही करतो व जाणतो हीच त्याची शक्तिमत्ता होय.।।१३।।

यतोऽस्मि सोऽधुनैवैते कला विद्या सरक्तयः।
कालश्च सर्वतत्त्वानां पूर्णभूमिर्निशा स्पृहा।।१४।।

अर्थ :- ज्याअर्थी मी शक्तिमान् आहे त्या अर्थी कला, विद्या व त्यावरील रक्तता-अनुराग हे माझ्या ठिकाणी आहेत. सर्वतत्त्वांना आधार हा काल आहे. निशा (रात्र), कालविभाग व स्पृहा (मनोधर्म) हे अप्रकाश जड वा अचेतन होत.।।१४।।

अप्रकाशांशगलने प्रकाशस्य स्फुटा स्थितिः।
प्रकाशदर्पणे भावदर्शनं तदभेदतः।।१५।।
भावानां भासनं शुद्धः प्रकाश इति पञ्चधा।
विद्यातत्त्वादाशिवान्तं तदभिन्नः परः शिवः।।१६।।

अर्थ :- अप्रकाशांशाचे निस्सरण (१) झाले की स्पष्ट (केवळ) प्रकाश (२) शिल्लक राहतो. प्रकाशरूप-आरशात (३) अभिन्नरूपाने सर्व

वस्तूंचे दर्शन-प्रतिबिंबन, वस्तूंचे भासणे-दिसणे, (४) आणि शुद्ध प्रकाश (५) असे प्रकाशविषयक पाच प्रकार होतात. विद्यातत्त्वापासून शिवतत्त्वापर्यंत पर-शिवतत्त्व अभिन्न अर्थात् एकरूप आहे असे (समजावे).।।१५।।१६।।

उपदेश्यतया सोऽपि स्यादवच्छेदभागतः।
अष्टात्रिंशं परं धाम यत्रेदं विश्वकं स्फुरत्।।१७।।

अर्थ :- औपाधिक किंवा मर्यादित भागदृष्ट्या पाहिल्यास तो परशिव, उपदेशिल्याशिवाय-सांगितल्याखेरीज कळत नाही. हा शिव अडतीसावे तत्त्व आहे. त्याच्या ठिकाणी हे सर्व विश्व स्फुरते अर्थात् प्रकट होते.।।१७।।

प्रत्येकमपि भावस्य यो भेदो ज्ञातृभेदतः।
यथा घटं वेद्मि तथा मया ज्ञातं शिवेन वा।।१८।।
इत्येवं स्वात्मनः सर्वमन्तः पश्यन् स्वसंविदा।
गलिताशेषभेदांशो भैरवीभावमश्नुते।।१९।।

अर्थ :- वस्तूंतील भेद ज्ञात्याच्या भेदज्ञानावर अवलंबून आहे. जसे "मी घट जाणतो" तसे "माझ्याकडून शिवरूपी घट जाणला गेला." अशा रीतीने आपल्यामध्येच सर्व विश्व स्व-ज्ञानाने पाहणारा साधक सर्वभेदांचे सूक्ष्मसूक्ष्मांश नष्ट झाल्यामुळे भैरवदेवाशी समत्व पावतो.।।१९।।

इयद्यदुक्तं तत्कोऽपि स्वयमेवावबुद्ध्यते।
कश्चिद् गुरूपदेशेन शास्त्राद्वाथ द्वयात्त्रयात्।।२०।।

अर्थ :- हे जे भैरवसमत्व आहे ते एखाद्या भाग्यवान् साधकाला आपोआप म्हणजे अल्पश्रमाने हस्तगत होते आणि एखाद्याला श्रीगुरूपदेशाने भैरवीभावाची प्राप्ती होते, तर दोन तीन शास्त्रांच्या परिशीलनानेही एखाद्याला भैरव देवाची कृपा हस्तगत होते. साधकाच्या अधिकारानुरूप हा लाभ होतो. इत्यर्थ।।२०।।

गुरोस्त्वभ्यस्तविज्ञानो दीक्षया स विमुच्यते।
दीक्षा च सामयी नाम मन्त्रतादात्म्यदायिनी।।२१।।

अर्थ :- किंवा गुरूपासून (दोन-तीन शास्त्रांच्या) तत्त्वज्ञानाचा व विज्ञानाचे शिक्षण घेऊन त्याचा अभ्यास (वारंवार परिशीलन) करणारा शिष्य दीक्षा घेऊन मुक्त होतो. सामयी-नामक दीक्षा मंत्राशी तादात्म्य प्राप्त

करून देणारी आहे. या दीक्षेमुळे साधक मंत्रस्वरूप होतो.।।२१।।

चर्याक्रमेण देहान्ते सम्यक्समयपालनात्।
सा च सर्वाध्वसंपूर्णमान्त्रसंविदभेदिता।।२२।।

अर्थ :- श्रीगुरुप्रोक्त आचाराच्या पालनाने आणि यावदायु तच्छास्त्रांतील सिद्धांताचे (अटींचे वा नियमांचे) विधियुक्त पालन वा आचरण केल्याने साधकाला (या सामयीदीक्षेने) आणवादि सर्वमार्गगत मंत्रज्ञानाशी अभेद (तद्रूपत्व) प्राप्ती होते (हेच ते मंत्रतादात्म्य होय.)।।२२।। (किंवा देहांती मंत्रतादात्म्याने साधकाला मुक्ती मिळते.)

गुरुणानुग्रहधिया शिष्ये यदवलोकनम्।
पौत्रिकी सा पुनश्चर्यामात्रेण प्रायणे यया।।२३।।
परं शिवत्वमभ्येति विनापि ज्ञानयोगतः।
सा च क्रमात्क्रमं शिष्यचितेः शिवनियोजनम्।।२४।।

अर्थ :- श्रीसद्‌गुरू साधकावर अनुग्रह करण्याच्या हेतूने कृपादृष्टीने पाहतात किंवा अवलोकन करतात ती पौत्रिकी दीक्षा होय. (सुपुत्रावर प्रेमळपित्याची जशी दृष्टी, तशी शिष्यावर श्रीगुरूंची दृष्टी असते.) गुरुपरिचर्यादि केल्याने ही दीक्षा देहान्ती।।२३।। परमशिवत्वलाभ करून देते. यात ज्ञानयोगातील क्लेश भोगावे लागत नाहीत. या पौत्रिकीदीक्षेत शिष्याचे चैतन्य (अंतरात्मा) परमचिद्रूपशिवाशी क्रमशः पायरीपायरीने संयोग पावत असते.।।२४।।

अतिक्रम्य तु षट्त्रिंशदन्तमध्वानमादरात्।
सा स्वस्थे प्राप्तमृत्यौ वा मृते दूरस्थ एव वा।।२५।।

अर्थ :- छत्तीस तत्त्वांपलीकडील मार्गाचे (क्रियेचे) आदराने अतिक्रमण करून ही दीक्षा (पौत्रिकी) शिवसंयोग साधून देते. मग तो स्वास्थ्यसंपन्न असो किंवा आजारी असो. (मुमूर्षु)मृत म्हणजे आसन्नमरण असो किंवा दूर, जवळ कोठेही असो त्याला मुक्ती प्राप्त होते.।।२५।।

गुर्वन्तेवासितद्बन्धुमुखोत्थाच्छक्तिपाततः।

अर्थ :- ही दीक्षा श्रीगुरूंच्या सन्निध राहणाऱ्या शिष्याने वा श्रीगुरुबंधूंनी दिली तरी चालते. ही पौत्रिकी दीक्षा शक्तिपाताने दिली जाते.।।

स्थावरेष्वथ दीक्षा हि पशुष्वापि निरूपिता।। २६।।

अर्थ :- स्थावरेष्व दीक्षा प्रेमाधिक्याने (कृपाधिक्याने) देता येते. पशूंवरही या दीक्षेचा प्रभाव पडू शकतो.।।२६।।

ते तु न ज्ञानहीनत्वात्साधका गुरवोऽपि वा।

अर्थ :- पशू व वृक्षादिस्थावर यांना ज्ञान नसल्यामुळे ते साधक व श्रीगुरूही असू शकत नाहीत.

समस्तज्ञानसंभारपूर्णस्वात्मविकासतः।। २७।।

वाञ्छन् साधकतां नेयो निष्कामस्तु गुरूत्तमः।।२७.५।।

अर्थ :- असे असले तरी पश्वादीनां दीक्षा द्यावयाची झाल्यास श्रीगुरूंनी निष्कामबुद्धीने सर्वज्ञानाने पूर्णस्वात्मविकासाच्या इच्छेनेच पशूला साधकत्व द्यावे.।।२७-१/२।।

सर्वसंपूर्णकृत्यस्य स्वात्मार्थेऽनभिलाषिणः।। २८।।

परिशेष्यात्परार्थेव ह्यनपाया क्रियेशवत्।

अर्थ :- कृतकृत्य व आत्मनिरपेक्ष होऊनच दुसऱ्या करिताच अपायरहित क्रिया करावी लागते अर्थात् दीक्षादि करावयाची असते हे ओघानेच आले. याला दृष्टान्त - ज्याप्रमाणे ईश्वर काही फलाशा धरून सृष्ट्यादि करीत नाही तर सृष्ट्यर्थच सृष्टी किंवा लीला म्हणूनच सृष्टी करतो त्याप्रमाणे निष्काम श्रीगुरूंनी पश्वादिदीक्षा साधावी.।।२८-१/२।।

नित्यं नैमित्तिकं चैव गुरुः समयिपुत्रके।। २९।।

द्वयेऽप्युपदिशेदाद्यः स्वयं नित्यमुपाचरेत्।

नैमित्तिकं गुरुः कुर्यात्तच्च पर्वदिनार्चनम्।। ३०।।

अर्थ :- श्रीगुरूंनी सामयी व पौत्रिकी या दीक्षेत उभयदीक्षितशिष्यांना नित्य व नैमित्तिक कर्मांचा उपदेश करावा. पैकी समयदीक्षिताने स्वतः नित्यकर्म करावे. श्रीगुरूंनी नैमित्तिक कर्म करावे. ते म्हणजे पर्वविशेषी करावयाचे पूजनादि कर्म होय.।।३०।।

यत्र सिद्धाश्चं खेचर्यः सकेतं चक्रिरे पुरा।

पवित्रकविधिश्चान्यो यः समग्रं प्रपूरयेत्।। ३१।।

अर्थ :- ज्या पर्वदिनाविषयी सिद्ध व खेचरी यांनी पूर्वीच हा संकेत

केला आहे. पर्वदिनार्चनविधीसारखा एक पवित्रकविधी आहे. हा विधी सर्व क्रियांना परिपूर्ण करतो किंवा दीक्षितांनी हा विधी आचरल्यास क्रियेतील त्रुटी भरून निघते.।।३१।।

नैमित्तिकं मुख्यकल्पं सर्वथा समुपाचरेत्।
शक्तितद्वदभेदेन स्वानन्दात्मकवस्तुनि।।३२।।

अर्थ :- नैमित्तिक कर्महीी मुख्य (नित्य) कर्मसारखेच समजून उत्तमरीत्या विधियुक्त करावे. स्वानंदात्मक आत्मवस्तूत शक्ती व शक्तिमान् (भैरवी व भैरव) यांचा अभेद पाहावा जाणावा.।।३२।।

तद्रसासारधातूत्था क्रिया मुख्यो विधिस्त्वयम्।
मासि मास्यथ वर्षे वा जन्ममध्येऽथ वा पुनः।।३३।।

अर्थ :- ही क्रिया (आचार) पार्थिवद्रव्य ज्या धातूंमध्ये सारभूत आहे (मांस मेद-मज्जादि) अशा धातूत निर्माण होणारी आहे व तो मुख्य विधी आहे. हा विधी प्रत्येक महिन्यात वा प्रतिवर्षी किंवा जन्मात-आयुष्यात एकदा वा साधारण अर्ध्या वयात करावयाचा आहे.।।३३।।

मुख्येन विधिना वृत्तिस्तर्हि चर्या न पूरिता।
अपूर्णचर्यायोगेन चर्यापायैकमुक्तिकः।।३४।।

अर्थ :- मुख्यविधीने सदैव वागल्यास दीक्षादृष्ट्या करावयाच्या आचारात त्रुटी निर्माण होते-चर्या अपूर्ण राहते आणि अपूर्णचर्येच्या योगाने मुक्तिस्वरूपही तसेच अपूर्ण राहते.।।३४।।

मुक्तो विघ्नं व्रजेत्तस्मात्सर्वथा पूरयद्विधिम्।।३४.५।।

अर्थ :- अशा प्रकारचा मुक्तही संकटाने ग्रस्त होतो म्हणून सर्वदृष्ट्या यथाशास्त्र विधिसंपादन आवश्यक आहे.।।

कश्चिदीशेच्छया सम्यगनाश्वस्तोऽपि चेतसा।।३५।।
निन्दन्नेव भजंश्चर्यां स तिरोहित उच्यते।।३५.५।।

अर्थ :- एखादा साधक मनाचे आश्वासन नसताही ईशेच्छेने, यदृच्छेने व कर्मधर्मसंयोगाने विधियुक्त आचरणाला नावे ठेवतो व आचरण अनिच्छया करतो, अशा साधकाला तिरोहित म्हणतात.।।३५-१/२।।

निन्द्यमाने महामन्त्रविद्याचर्यादिकोपजम्।। ३६।।
पाप्मैषां पातयेद् घोरे यातनाधाम्नि सर्वथा।। ३६.५।।

अर्थ :- तिरोहित साधक चर्येला नावे ठेवू लागला तर त्या महामंत्ररूप विद्याचर्येच्या कोपामुळे उत्पन्न झालेले पातक त्या तिरोहित साधकांना घोर अशा यातनांच्या व दुःखांच्या खाईत टाकते. निंदेमुळे विद्याकोप होतो व साधक दुःखी होतात.।। ३६-१/२ ।।

कस्यापि तु तिरोभूतवृत्तेरपि पुनर्निजम्।। ३७।।
हृदयं सम्यगाश्वासादविघ्नं शिवतां व्रजेत्।। ३७.५।।

अर्थ :- एखाद्या तिरोहितवृत्तिक साधकाचे अंतःकरण चांगल्या आश्वासनामुळे निर्विघ्नपणे शिवत्वही मिळवील. तिरोहित साधक विश्वास ठेवत राहिल्यास शिवत्वलाभ करून घेईल. मुक्त होईल.।। ३७.५।।

एवं धीप्राणसंबंधादान्तराद् बाह्यतोऽपि च।। ३८।।
चर्चया यः समावेशः स इहाणव उच्यते।। ३८.५।।

अर्थ :- अशा रीतीने बुद्धी व प्राण-संबंधामुळे अंतःकरण दृष्ट्या व बाह्य (शरीर) दृष्ट्या विद्याचर्येमुळे होणारा जो समावेश आहे त्याला आणव (समावेश) असे म्हणतात.।। ३८/३८.५।।

तस्मिन् रूढः समभ्येति शाक्तमस्माच्च शाम्भवम्।। ३९।।
ततः परं पूर्वसत्तां पररूढस्तु न त्यजेत्।। ३९.५।।

अर्थ :- आणवसमावेशारूढ साधकाला शाक्तसमावेश साधेल व नंतर क्रमशः शांभवसमावेश साधतो. पुढील समावेश साधले तरी मागील समावेशाचा अभ्यास सोडू नये.।। ३९-१/२ ।।

उल्काहस्तो यथा कश्चित् प्राप्यमादाय तां त्यजेत्।। ४०।।
ज्ञानेन ज्ञेयमालोक्य तथा ज्ञानं त्यजेदिति।। ४०.५।।

अर्थ :- ज्याप्रमाणे अंधारातील पदार्थ दिव्याच्या (दीपाच्या-मशालीच्या) साहाय्याने पाहून मिळवून दीप व मशाल टाकून दिली तर चालते त्याप्रमाणे ज्ञानाने ज्ञेय जाणून ज्ञान टाकावे विसरावे.।। ४०-१/२ ।।

उक्तं श्रीकालपादादौ ज्ञाने नष्टे न तत्सदा।।४१।।
ज्ञप्तिसाधनमेवोक्तं न ज्ञेयं परमं पदम्।।४२।।

अर्थ :- श्रीकालपादादि ग्रंथात सांगितले असले तरी ज्ञान हे नष्ट झाल्यास ते ज्ञेय पुन्हा उपलब्ध होत नाही. ज्ञेयाचे ज्ञान साधनरूप ज्ञानाने होते म्हणून ज्ञान व ज्ञेय यांचा त्याग करू नये. हाच नियम आणवादि-समावेशाच्या बाबतीत आहे.।।४१।।

एषाभिनवगुप्तेन रचिता तन्त्रधानिका।
हृद्भूमौ यस्य रूढा स शिवकल्पमहारूहः।।४३।।

अर्थ :- श्रीअभिनवगुप्तमुनीने रचलेली ही तंत्रधानिका (रचलेले हे तंत्रबीज) ज्याच्या हृदयरूप भूमीत अंकुरित होईल-रूजेल तो साधक शिवरूपी कल्पवृक्षच समजावा. या तंत्राचा ज्ञाता म्हणजे आचरणकर्ता शिवतुल्य किंवा श्रीशिवच होय.।।४३।।

इति श्रीमदभिनवगुप्ताचार्यविशेषविरचितायां
तन्त्रवटधानिकायां तृतीयम् आह्निकम्
।।समाप्ताचेयं तन्त्रवटधानिका।।

❖ श्लोकसूची ❖

कंसातील आकडे अनुक्रमे आह्निक व श्लोकाचे आहेत.
कंसाबाहेरील आकडे पृष्ठ क्रमांक दर्शवितात.

★ तंत्रवटधानिकासार ★

आद्याशक्ती तत्त्वातीत अर्थात् तत्त्वाच्या पलीकडील असूनसुद्धा सर्वतत्त्वमयी आणि प्रपंचरूपा आहे. ती नित्य परमानंद स्वरूपिणी असून या चराचर जगाचे बीजस्वरूप आहे. ती प्रकाशात्मक शिवाच्या स्वरूपाचे उद्‌बोधन करणारा अर्थात् ज्ञान करून देणारा आरसाच आहे. "अहम्" चे ज्ञानच शिवस्वरूप आहे. आद्याशक्तीचा आश्रय घेतल्याशिवाय आत्मज्ञान प्रगट होत नाही. तंत्रशास्त्राचे विद्वान् असे म्हणतात की, ज्याप्रमाणे एखादी व्यक्ती आपल्यासमोर असलेल्या निर्मल आरशात आपल्या प्रतिबिंबाला पाहून त्या प्रतिबिंबाला "अहं" च्या रूपात ओळखते त्याप्रमाणे परमेश्वर आपल्या अधीन असलेल्या शक्तीला पाहूनच अर्थात् शक्तिद्वाराच स्वस्वरूपाची उपलब्धी अर्थात् जाणीव करून घेत असतो. आत्मशक्तीचे दर्शन तसेच आत्मस्वरूपाचे ज्ञान आणि आस्वादन अर्थात् आत्मानुभव हे सर्व एकच वस्तुरूप आहेत. हाच पूर्णाहंतेचा चमत्कार किंवा सच्चिदानंदाची घनीभूत अभिव्यक्ती आहे. "मी पूर्ण आहे" हे ज्ञानच नित्य-सिद्ध-आत्मज्ञानाचे प्रकृत स्वरूप आहे. ज्याप्रमाणे वस्तूचा निकट संबंध नसेल तर आरसा प्रतिबिंबाचे ग्रहण करू शकत नाही किंवा वस्तू जरी जवळ असली तरी प्रकाशाच्या अभावामुळे आरशातील प्रतिबिंब हे प्रतिबिंबरूपात दिसत नाही त्याचप्रमाणे ही पराशक्तीदेखील प्रकाश स्वरूप परमशिवाच्या सान्निध्याशिवाय आपल्या अंतःस्थित अर्थात् अंतरंगात असलेल्या विश्वप्रपंचाला प्रकट करण्यास समर्थ ठरत नाही. याच कारणामुळे शुद्धशिव अथवा शुद्धशक्ति परस्परसंबंधरहित होऊन एककटे जगाच्या निर्माणाचे कार्य करू शकत नाहीत. दोघांच्या सापेक्ष सहकार्याशिवाय सृष्टिकार्य निर्माण होणे असंभव आहे. सर्व तत्त्वे या दोघांच्या परस्पर संबंधानेच उद्‌भूत होतात. यामुळे शिव आणि शक्ती किंवा प्रकाश आणि विमर्श हे परस्पर भिन्न आणि स्वतंत्र पदार्थ आहेत असे कोणीही मानू नये.